दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७४ | रविवार दि.१३ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### दारूबंदीचा आदेश की पुणेकरांवर संशय?

गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण उत्सवाच्या नावाखाली नागरिकांचे स्वातंत्र्य, व्यवसायाचे अधिकार आणि संपूर्ण जिल्ह्याची प्रतिमा यांना गृहित धरून निर्णय घेण्याचा अधिकार प्रशासनाला कोणी दिला? पुण्यात गणेशोत्सवाच्या काळात मद्यविक्रीवर सरसकट बंदी घालण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेली कठोर भूमिका हा याच प्रश्नाचा नेमका वेध घेणारा धडा आहे. अधिकार हातात आहेत म्हणून ते विवेकशून्यपणे वापरण्याची मुभा प्रशासनाला नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## पावसाने ओढ दिल्याने खरीप, पाणी, चारा अन् रोजगार संकटात; सरकारची धावपळ सुरू

# दुष्काळाच्या छायेत महाराष्ट्र; सरकारचा १६, १८ सप्टेंबरला विभागनिहाय आढावा

मुंबई । प्रतिनिधी

**पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे राज्यातील अनेक भागांत खरीप हंगाम अडचणीत आला असून, महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट गडद होत चालले आहे. पिकांची वाढ खुंटण्याबरोबरच पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण रोजगाराचा प्रश्नही आगामी काळात गंभीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील पुढील आठवड्यात राज्यातील चार महसूल विभागांचा सविस्तर आढावा घेणार असून, या बैठकीत थेट तालुका स्तरापर्यंतची परिस्थिती जाणून घेतली जाणार आहे.**



### १६ व १८ सप्टेंबरला चार विभागांची ऑनलाइन बैठक; तालुकानिहाय परिस्थितीचा घेणार आढावा

#### बैठकीनंतर मदतीचा मार्ग स्पष्ट होणार

पावसाची कमतरता, खरीप पिकांची अवस्था, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण रोजगार या पाचही आघाड्यांवरील परिस्थितीचा एकत्रित आढावा घेतल्यानंतर राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची तीव्रता स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे १६ आणि १८ सप्टेंबरच्या बैठकीकडे शेतकरी, ग्रामीण जनता आणि प्रशासनाचे लक्ष लागले आहे. सरकारकडून केवळ आढावा घेऊन न थांबता, परिस्थिती गंभीर असलेल्या भागांसाठी तातडीची मदत, पाणीपुरवठा, चारा नियोजन आणि रोजगाराच्या उपाययोजना करण्याची अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक विभागासाठी १६ सप्टेंबर, तर पुणे आणि अमरावती विभागासाठी १८ सप्टेंबर रोजी ऑनलाइन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत जिल्हानिहाय पावसाची स्थिती, पावसातील तूट, खरीप पिकांची सद्यस्थिती ◄◄ पान २ वर

## थोडक्यात...

### समाजवादी विचारवंत डॉ. रत्नाकर महाजन यांचे निधन

पुणे: ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, राज्य नियोजन मंडळाचे माजी कार्यकारी अध्यक्ष, काँग्रेसचे प्रवक्ते डॉ. रत्नाकर महाजन (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी रात्री पुण्यात निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या समाजवादी, पुरोगामी आणि वैचारिक चळवळीतील एक महत्त्वाचा आवाज काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई असा परिवार आहे. महाजन यांच्यावर शनिवारी (दि. १२) वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेतले. डॉ. महाजन यांचा जन्म १४ जून १९४६ रोजी इंदापूर येथे झाला. शालेय शिक्षण इंदापूर येथे घेतले. नाशिक येथे वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच त्यांनी विद्यार्थी चळवळीत सहभागी होऊन समाजकार्याची सुरुवात केली. १९७१ मध्ये युवक क्रांती दलाच्या माध्यमातून महागाई, बेकारी आणि भ्रष्टाचाराविरोधातील आंदोलनात त्यांचा सहभाग होता.

### काँग्रेसचे मोरे यांच्यावरील कारवाईचा नांदेडमध्ये निषेध

नांदेड: महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्यावर नागपूर येथे पोलिस अधिकाऱ्यांकडून अमानुष मारहाण करण्यात आली. या कारवाईच्या निषेधार्थ तसेच संबंधित दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यामार्फत शासनास निवेदन देण्यात आले. या निवेदनात सदर घटनेची निष्पक्ष चौकशी करून संबंधित दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर अशा प्रकारची कारवाई होणे ही गंभीर बाब असून, अशा घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी भूमिका यावेळी पदाधिकाऱ्यांनी मांडली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सचिव सत्यजीत बिरादार, नांदेड युवक काँग्रेस शहराध्यक्ष शंकर शिंदे, प्रदेश युवक काँग्रेस सचिव अभिलाष पावडे, गणेश पाटील कोकाटे, अंबादास रातोळे, ठरवक जिल्हाध्यक्ष अक्षय नळगे, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१२ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६६.५० क्विंटल | २,६४१ | ३,४४९ | २,८२९ |
| ज्वारी/हायब्रिड: १०१.५० क्विंटल | २,७०२ | ५,३३१ | ३,६७८ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,००० | ८,००० | ७,००० |
| उडीद :२२.५० क्विंटल | ७,८०० | ८,५८० | ८,१७७ |
| बाजरी: ५१.५० क्विंटल | २,३०० | २,९५७ | २,७९९ |
| मुग: २२.०० क्विंटल | ५,००० | ९,६५० | ८,९०७ |
| सोयाबीन: ३०.०० क्विंटल | ५,५०० | ५,७९० | ५,६४५ |
| हरभरा: १७.५० क्विंटल | ५,४०० | ६,२०० | ५,८५८ |

# ११ सप्टेंबरपासून आझाद मैदानात जरांगेंचे उपोषण

### १५ सप्टेंबरला अंतरवाली सोडणार, वाटेत चार मुक्काम करणार



जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागण्यांवर अद्याप तोडगा निघालेला नाही. यामुळे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. ते आता मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत. त्यांनी १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघणार असल्याची ◄◄ पान २ वर

#### मुंबईतील आंदोलनाची प्लॅनिंग ऑगस्टमध्येच ?

जरांगे यांच्या समर्थकांनी आधी मुंबई पोलिसांकडे रितसर परवानगी मागितली असून, त्यानंतरच आंदोलनाची पुढील आखणी केल्याचे स्पष्ट झाले आहे. मनोज जरांगे यांच्या समर्थकांनी १८ ऑगस्ट आणि २७ ऑगस्ट रोजी मुंबई पोलिसांना अर्ज सादर केले होते. या अर्जांमधूनच १९ सप्टेंबर रोजी आझाद मैदानावर होणाऱ्या आंदोलनासाठी परवानगी मागण्यात आल्याचा उल्लेख आहे. आझाद मैदानावरील आंदोलनासाठी आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मंगळवारी मुंबई महापालिकेकडे अर्ज दिला जाणार आहे.

#### तर आंदोलक महिला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे घर गाठणार

सर्व महिलांनी अमृताताई आणि लताताई यांच्या घरी हळदी कुंकू घेऊन जायचे. अमृताताई आणि लताताईकडे तुम्ही हळदी–कुंकू घेऊन जा, हळदी कुंकू लावा. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदेंची बायको हळदी–कुंकाला बाहेर नाही आल्यात तर हे हिंदू कसे? हळदी–कुंकू सौभाग्याचे लेणे आहे. फडणवीसांनी लाडकी दीदी आणि एकनाथ शिंदेंची लाडकी बहीण ते उन्हात उभे करणार नाहीत. दोघांना २५ लाख महिलांना जेवण द्यावे लागेल. अमृताताई आणि लताताई कडे जायचं, हिंदू असतील तर त्या बाहेर येतील. अन्यथा सगळ्या जगात याची बातमी जाईल. असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.



## विद्यार्थ्यांच्या मृत्यूसाठी यंत्रणाच जबाबदार-पवार

लातूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील अनियमिततेविरोधात शनिवारी लातूरमध्ये आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात हजारो परीक्षार्थी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शप) चे आमदार रोहित पवार सहभागी झाले होते. मोर्चानंतर जिल्हा परिषदेच्या आवारात जमलेल्या विद्यार्थ्यांना संबोधित करताना पवार यांनी एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी केली.

धाराशिव जिल्ह्यातील परांडा येथील परीक्षार्थी प्रथमेश देशमुख याने केलेल्या आत्महत्येचा उल्लेख करत पवार म्हणाले, ◄◄ पान २ वर

## विजय मल्ल्या अजूनही कायद्यापासून पळतोय


मुंबई । प्रतिनिधी

मनी लॉंड्रिंग प्रकरणी फरार झालेला विजय मल्ल्या अजूनही भारतातील कायदेशीर प्रक्रियेपासून दूर पळत आहे आणि बँकांनी कर्ज वसुली केली असली तरी त्यावरून मनी लॉंड्रिंगच्या आरोपांतून मुक्त होत नाहीत, अशी माहिती अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मुंबई उच्च न्यायालयात दिली. मल्ल्याने २०२० मध्ये दाखल केलेल्या याचिकेला उत्तर म्हणून या केंद्रीय तपास संस्थेने आपले प्रतिज्ञापत्र सादर केले. आपल्यावरील फौजदारी खटले बंद करावेत, अशी मागणी मल्ल्याने या याचिकेद्वारे केली होती. कर्ज वसुली झाल्यानंतर ◄◄ पान २ वर

## मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर महाराष्ट्र सरकारचा बडगा; राज्यभर तपासणी मोहीम राबवणार

मुंबई । प्रतिनिधी

**नशामुक्त चालक, सुरक्षित प्रवास आणि कार्यक्षम महाराष्ट्र ही मोहीम महाराष्ट्रात २०२६ ते २०२९ या कालावधीत राबवली जाईल. बस, कॅब आणि टॅक्सीसह विविध वाहनांच्या चालकांची अल्कोहोल आणि ड्रग्ससाठी चाचणी केली जाईल.**



प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देत, महाराष्ट्रात "नशामुक्त चालक, सुरक्षित प्रवास आणि कार्यक्षम महाराष्ट्र" नावाची मोहीम सुरू केली जाईल. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, मद्य आणि अमली पदार्थ चाचणी प्रणाली २०२६ ते २०२९ पर्यंत विस्तारित केली जाईल. राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी चालक आणि वाहकांच्या मादक द्रव्य चाचणीसाठी १ लाख रुपयांच्या अनुदानाची घोषणा केली. या रकमेचा वापर चाचणी यंत्रे खरेदी करण्यासाठी केला जाईल. मंत्री प्रतीप सरनाईक म्हणाले की, या मोहिमेत एसटी कॉर्पोरेशन, महानगरपालिका बस सेवा, सरकारी वाहने, सार्वजनिक क्षेत्रातील ◄◄ पान २ वर

## पिकांवर रोटाव्हेटर फिरवू नका, नुकसानीच्या पंचनाम्यासाठी पुरावे राहतील, सहकारमंत्र्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

लातूर । प्रतिनिधी

राज्यातील अनेक भागात विशेषत: मराठवाड्यात३ पावसाने सुमारे दीड महिना दडी मारल्याने खरीप पिके करपून गेली आहेत. हातातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. यामुळे नुकसान झालेल्या सोयाबीनसह इतर पिकांवर काही शेतकऱ्यांनी रोटाव्हेटर फिरवल्याचे दिसून आले आहे. याची गंभीर दखल राज्य सरकारने घेतली आहे. या पार्श्वभूमीवर सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी शेतकऱ्यांना नुकसानग्रस्त पिकांवर रोटाव्हेटर फिरवू नका, असे आवाहन केले आहे.

खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त पिके जाळू नका किंवा त्यावर रोटाव्हेटर फिरवू नका. पीक ज्या परिस्थितीत आहे, त्याच अवस्थेत ठेवावे. जेणेकरून पंचनामा, पीक विमा व सरकारच्या मदतीसाठी नुकसानीचे पुरावे उपलब्ध राहतील, असे सहकारमंत्र्यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. या संकटात सरकार आपल्या पाठीशी आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे, ◄◄ पान २ वर

## लातूरच्या इतिहासातील सर्वात भीषण दुष्काळ–आ.निलंगेकर

लातूर । प्रतिनिधी

या मान्सूनमध्ये पावसाअभावी जिल्ह्यातील सर्व १४५ मोठ्या आणि लहान प्रकल्पांमधील पाणीसाठा डेड–स्टोरेज पातळीवर पोहोचला असून, लातूर आपल्या इतिहासातील सर्वात भीषण दुष्काळाचा सामना करत आहे, असे भाजप आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी शनिवारी सांगितले.

प्रकल्पांमध्ये केवळ १४ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे, त्यामुळे राज्य सरकारने उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असे त्यांनी सांगितले. पावसाचा दीर्घकाळ खंड पडल्यामुळे जिल्ह्यातील १०० टक्के खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. सोयाबीन आणि इतर पिकांची योग्य वाढ झालेली नाही. ◄◄ पान २ वर

# ब्रिक्सच्या बैठकीत एकतर्फी शुल्क आणि बळजबरीच्या उपाययोजनांवर चिंता व्यक्त




दिल्ली । वृत्तसंस्था

'नवी दिल्ली जाहीरनाम्या'द्वारे ब्रिक्स देशांनी व्यापार विस्कळीत करणाऱ्या आणि जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) नियमांशी विसंगत असलेल्या एकतर्फी शुल्क (टेरीफ) व शुल्क–व्यतिरिक्त उपाययोजनांच्या वाढत्या वापराबाबत गंभीर चिंता व्यक्त केली; तसेच आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरोधात असलेल्या एकतर्फी बळजबरीच्या उपाययोजनांचा निषेध केला. संघर्ष निवारणाच्या प्रयत्नांमध्ये विशेषत: संघर्षांची ◄◄ पान २ वर

#### पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध

नवी दिल्ली येथे जारी करण्यात आलेल्या ब्रिक्स नेत्यांच्या संयुक्त जाहीरनाम्यात जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला होता. उल्लेखनीय म्हणजे, ब्रिक्सच्या अधिकृत निवेदनात या हल्ल्याचा निषेध करण्याची ही सलग दुसरी वेळ आहे. गेल्या वर्षी परराष्ट्र मंत्र्यांच्या निवेदनात याचा उल्लेख होता, तर यंदा थेट राष्ट्रप्रमुखांच्या संयुक्त जाहीरनाम्यात याचा समावेश करण्यात आला आहे. जाहीरनाम्यात म्हटले आहे की, "२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू–काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा आम्ही अत्यंत तीव्र शब्दांत निषेध करतो.

## ऑक्टोबरमध्ये रेपारेट वाढणार

### कर्जदारांची चिंता वाढली!




मुंबई । प्रतिनिधी

घर, कार किंवा शिक्षणासाठी बँकेकडून कर्ज घेतले असेल तर मग ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. दर महिन्याला भराव्या लागणाऱ्या इएमआय मुळे अनेक लोक चिंतेत असतात. त्यातच व्याजदरात वाढ झाली तर ◄◄ पान २ वर

## अग्रलेख

# दारूबंदीचा आदेश की पुणेकरांवर संशय?

## गणेशोत्सवाच्या नावाखाली प्रशासनाची मनमानी; उच्च न्यायालयाची चपराक

गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण उत्सवाच्या नावाखाली नागरिकांचे स्वातंत्र्य, व्यवसायाचे अधिकार आणि संपूर्ण जिल्ह्याची प्रतिमा यांना गृहित धरून निर्णय घेण्याचा अधिकार प्रशासनाला कोणी दिला? पुण्यात गणेशोत्सवाच्या काळात मद्यविक्रीवर सरसकट बंदी घालण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेली कठोर भूमिका हा याच प्रश्नाचा नेमका वेध घेणारा धडा आहे. अधिकार हातात आहेत म्हणून ते विवेकशून्यपणे वापरण्याची मुभा प्रशासनाला नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

पुणे हा केवळ महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखला जाणारा जिल्हा नाही; सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा रुजविणारे हे शहर आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचे काम केले. आज याच उत्सवासाठी देश-विदेशातून भाविक पुण्यात येतात. अशा शहरात उत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र कायदा-सुव्यवस्था राखण्याचा मार्ग म्हणून संपूर्ण जिल्ह्यात दहा दिवस मद्यविक्री बंद करण्याचे तर्कशास्त्र कितपत योग्य आहे? याच प्रश्नावर उच्च न्यायालयाने प्रशासनाला धारेवर धरले. राज्यभरात अनेक सण-उत्सव सुरू असताना दारूबंदीसाठी केवळ पुण्याचीच निवड का करण्यात आली, असा न्यायालयाचा सवाल आहे. हा प्रश्न साधा असला तरी त्याचे उत्तर प्रशासनासाठी अवघड आहे. कारण पुणे वेगळे का? पुणेकर वेगळे का? आणि पुण्यातील नागरिकांवरच असा विशेष संशय का? जर मद्यविक्रीमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे असेल, तर त्यासाठी ठोस आकडेवारी, पूर्वानुभव, गुन्हेगारीचे विश्लेषण किंवा विशिष्ट परिस्थितीचा आधार असणे अपेक्षित आहे. केवळ 'दारू प्यायल्याने गोंधळ होऊ शकतो' या गृहितकावर संपूर्ण जिल्ह्याला शिक्षा देता येणार नाही. प्रशासनाने शक्यता आणि पुरावा यातील फरक समजून घेणे गरजेचे आहे. सर्वांत गंभीर बाब म्हणजे अशा निर्णयातून पुणेकरांच्या सामाजिक प्रतिमेलाच एकप्रकारे धक्का बसतो. गणेशोत्सव आला की पुण्यात कायदा-सुव्यवस्था बिघडते, मद्यविक्री झाली की गुन्हे वाढतात आणि त्यामुळे सर्व नागरिकांवर सामूहिक निर्बंध लादणे आवश्यक आहे, असा संदेश यातून जातो. हा केवळ प्रशासकीय निर्णय राहत नाही; तो संपूर्ण समाजाकडे संशयाने पाहण्याचा दृष्टिकोन ठरतो. प्रशासनाला प्रतिबंधात्मक कारवाईचे अधिकार आहेत. परवानाधारक मद्यविक्री केंद्रांवर नियमांची कठोर अंमलबजावणी करता येते. संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलिस बंदोबस्त करता येतो. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करता येते. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर कठोर दंड करता येतो. मग दोष करणाऱ्या व्यक्तीऐवजी संपूर्ण जिल्ह्यालाच दोषी ठरविण्याची घाई कशासाठी? हा प्रश्न केवळ दारूविक्री करणाऱ्या व्यावसायिकांच्या हिताचा नाही. प्रश्न आहे तो प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा. आज दारूच्या नावाखाली संपूर्ण जिल्ह्यावर निर्बंध; उद्या कोणत्या कारणाने कोणत्या नागरिकाच्या अधिकारावर मर्यादा आणली जाईल, याची शाश्वती काय? लोकशाहीत प्रशासनाचे काम नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित आणि सुव्यवस्थित करणे आहे; नागरिकांना आपल्या निर्णयांच्या चौकटीत जबरदस्तीने बसविणे नव्हे. विशेषतः व्यवसायाच्या अधिकारावर परिणाम करणारा आदेश काढताना प्रशासनाने अधिक जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. अनेक व्यावसायिक, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक हित अशा निर्णयाशी जोडलेले असते. त्यामुळे एखादा निर्बंध आवश्यक असेल तर त्यामागे स्पष्ट, तर्कसंगत आणि न्याय्य कारण असले पाहिजे. 'आम्हाला अधिकार आहे' हे कारण स्वतःमध्ये पुरेसे कारण नाही. उच्च न्यायालयाची भूमिका त्यामुळे प्रशासनासाठी आरसा आहे. हा आरसा केवळ पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी पाहण्याची गरज नाही; राज्यातील प्रत्येक अधिकाऱ्याने पाहण्याची गरज आहे. कारण लोकशाहीमध्ये कायदे आणि अधिकार यांच्याबरोबर विवेक, समानता आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याचा आदर हीसुद्धा प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे.

गणेशोत्सव हा भक्तीचा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव आहे. तो शांततेत पार पडायलाच हवा. पण शांतता प्रस्थापित करण्यासाठी संपूर्ण समाजावर संशय घेण्याची गरज नाही. काहींच्या संभाव्य गैरवर्तनासाठी सर्वांना दोषी ठरविणे हा प्रशासनाचा सोपा मार्ग असू शकतो; मात्र तो लोकशाहीचा मार्ग नाही. पुणेकरांना उत्सव साजरा करण्यासाठी प्रशासनाच्या परवानगीची नव्हे, तर सुरक्षित आणि न्याय्य वातावरणाची गरज आहे. प्रशासनाने नागरिकांवर विश्वास ठेवावा आणि नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करावी. कारण लोकशाहीचा अर्थ नागरिकांवर नियंत्रण ठेवणे नाही; तर नागरिकांचे अधिकार जपून व्यवस्था चालविणे हा आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या चपराकीतून प्रशासनाने एवढे तरी शिकावेनिर्बंध लावण्यापूर्वी कारण तपासा, आदेश काढण्यापूर्वी त्याची गरज सिद्ध करा आणि अधिकार वापरताना नागरिकांना संशयितांच्या पिंजऱ्यात उभे करू नका. गणेशोत्सवाच्या नावाखाली पुणेकरांवर संशय घेण्याची गरज नाही; प्रशासनाने आपल्या निर्णयक्षमतेवरच संशय घेण्याची वेळ येऊ देऊ नये.

# फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीत पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची कार्यशाळा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**श्रद्धा आणि परंपरा जपत असताना निसर्गाचे संतुलन राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सण-उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे, असे प्रतिपादन दै.मराठवाडा साथीचे प्रतिनिधी कुणाल दुगड यांनी केले.**

फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी, माजलगाव येथे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या तसेच भारतीय संस्कृतीतील सण-उत्सवांचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची विशेष कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आली होती. यावेळी कुणाल दुगड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक होते. प्रमुख पाहुणे म्हणून दै.सकाळचे तालुका प्रतिनिधी कमलेश जाब्रस, दै.दिव्य मराठीचे प्रतिनिधी दिलीप झगडे, दै.मराठवाडा साथी चे प्रतिनिधी कुणाल दुगड तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सारिका बजाज उपस्थित होत्या. प्लास्टर ऑफ पॅरिस तसेच रासायनिक रंगांपासून तयार करण्यात येणाऱ्या गणेशमूर्तींच्या विसर्जनामुळे जलप्रदूषणासह पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी नैसर्गिक व पर्यावरणास हानी न पोहोचविणाऱ्या साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले. कृष्णा गायकवाड व कृष्णा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी माती व इतर पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला आणि कलागुणांना वाव देत विविध आकारांच्या सुंदर मूर्ती साकारल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कला व हस्तकौशल्यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला. यावेळी कमलेश जाब्रस यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. घरगुती गणपतीसाठी मातीच्या मूर्तींचा व नैसर्गिक रंगांचा वापर करावा तसेच विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करावा, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, उपक्रमांतर्गत प्री-प्रायमरी विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध श्लोक लिहून आणत त्यांचे उत्स्फूर्त पठण केले. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी अष्टविनायकांची नावे लिहून त्यांचे योग्य उच्चारासह पठण केले. तर इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी श्री गणपती बाप्पांची विविध नावे लिहून त्यांचे पठण केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्यासोबतच स्मरणशक्ती, वक्तृत्व व आत्मविश्वासाला चालना मिळाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच सामाजिक व पर्यावरणीय जाणीव निर्माण करणारे विविध उपक्रम फ्लाईंग बर्ड्स अकॅडेमीत सातत्याने राबविले जातात. या उपक्रमाचे संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद व पालकांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनल होन्ना यांनी केले. प्रास्ताविक मनिषा डाके यांनी केले, तर आभार प्रदिका मॅडम यांनी मानले.

# कुणबी प्रमाणपत्रासाठी १३ शिबिरांत ४७ अर्ज

**जालना । प्रतिनिधी**

**कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यासाठी जिल्ह्यात दि. १२ सप्टेंबर रोजी आयोजित १३ शिबिरांमध्ये एकूण ४७ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.**



कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यासाठी जिल्ह्यात दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या तीन दिवसात एकूण २०४ अर्ज प्राप्त झाले आहेत. आज झालेल्या शिबिरात तालुकानिहाय प्राप्त अर्जांमध्ये जालना तालुक्यातील दोन शिबिरांत ९, बदनापूर तालुक्यातील दोन शिबिरांत १७, भोकरदन तालुक्यातील दोन शिबिरांत १६, तर जाफराबाद तालुक्यातील एका शिबिरात ५ अर्ज प्राप्त झाले. अंबड व घनसावंगी तालुक्यांत प्रत्येकी दोन, तसेच परतूर व मंठा तालुक्यांत प्रत्येकी एक शिबिर आयोजित करण्यात आले. जालना उपविभागात चार शिबिरांमधून २६, तर भोकरदन उपविभागात तीन शिबिरांमधून २१ अर्ज प्राप्त झाले. अंबड उपविभागातील चार आणि परतूर उपविभागातील दोन शिबिरांत एकही अर्ज प्राप्त झाला नाही. प्राप्त सर्व ४७ अर्ज न्यायमूर्ती शिंदे समिती प्रवर्गातील असून गॅझेट प्रवर्गातील अर्ज प्राप्त झालेला नाही. तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या निर्णयानंतर प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्यात येतील, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

# 'कलाकारांच्या सर्जनशीलतेला मिळणारे हे व्यासपीठ कौतुकास्पद'-मनीषाताई टोपे



**जालना । प्रतिनिधी**

**चित्रकलेच्या विविध कलाविष्कारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या यशवंतराव चव्हाण सेंटर वअजिंठा चित्रकला महाविद्यालय व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मान्सून शो२०२६' या ३३व्या राज्यस्तरीय कला प्रदर्शनाला श्रीमती मनीषा ताई टोपे यांनी भेट देऊन कलाकारांच्या कलाकृतींची पाहणी केली. यावेळी त्यांनी कलाकारांचे कौतुक करत, जालना नगरीत अशा प्रकारचे राज्यस्तरीय कला उपक्रम आयोजित होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.**

आज प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन कलाकृतींचा आस्वाद घेतला. विविध माध्यमांतील चित्रे, कलाविष्कार आणि कलाकारांची सर्जनशीलता पाहून विद्यार्थी व कला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. मा. डॉ. दीक्षा टोपे यांनीही कला प्रदर्शनाला भेट देऊन कलाकृतींची पाहणी केली. जालन्यात कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणारे असे उपक्रम होत असल्याचे पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. प्रदर्शनातील कै. अंभोरे सरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेले दालन विशेष आकर्षण ठरत आहे. या दालनाला भेट देणाऱ्या नागरिकांकडून त्याचे विशेष कौतुक होत असून, कै. अंभोरे सरांच्या कलाविषयक योगदानाची आठवण जपण्यासोबतच त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या माध्यमातून होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. तसेच अजिंक्य भैय्या टोपे यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील छायाचित्रांचेही प्रदर्शनात विशेष कौतुक होत आहे. त्यांच्या छायाचित्रांमधील विषयवैविध्य, कलात्मकता आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची मांडणी कला रसिकांचे लक्ष वेधून घेत आहे. या छायाचित्रांमुळे प्रदर्शनाला वैविध्यपूर्ण आणि व्यापक कलादृष्टी प्राप्त झाली असल्याचे मतही व्यक्त होत आहे. कला, संस्कृती आणि सर्जनशीलतेला चालना देणारे असे उपक्रम जालना शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारे असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. या प्रसंगी प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे, श्री प्रशांत महाजन, श्री सचिन मुंदडा, प्राचार्य शहा सर, सुनील सोलाट, प्राचार्य दादासाहेब गजहंस, संजय पाटील, प्रा. सुजाता देवरे, प्रा. रणजित बायस, प्रा. डॉ. रविकिरण भुतेकर, प्रा. शंकर वैद्य, प्रा. दत्तात्रय देशमुख सर, प्रा. शंकर तिकांडे, प्रा. स्वप्नील रगडे यांच्यासह कला क्षेत्रातील मान्यवर, कलाकार, विद्यार्थी व कला रसिक उपस्थित होते.

# पान १ वरून...

## दुष्काळाच्या छायेत महाराष्ट्र; सरकारचा

आणि पावसाअभावी निर्माण झालेल्या संकटाचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. यंदाच्या खरीप हंगामात अनेक भागांत पावसाने अपेक्षित साथ दिलेली नाही. काही ठिकाणी पेरणीनंतर समाधानकारक पाऊस झाला नसल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. तर काही भागांत पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर उत्पादन घटण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. सरकारच्या बैठकीत जिल्हानिहाय खरीप पिकांची स्थिती तपासली जाणार आहे. कोणत्या भागात पिकांना पाण्याची गरज आहे, कुठे पिकांचे नुकसान सुरू झाले आहे आणि आगामी काळात पाऊस न झाल्यास परिस्थिती किती गंभीर होऊ शकते, याचा अंदाज घेण्यात येणार आहे. पावसाची मोठी तूट असलेल्या गावांची आणि तालुक्यांची स्वतंत्र माहिती प्रशासनाकडून घेतली जाणार आहे. प्रत्यक्ष पर्जन्यमानाबरोबरच पिकांची स्थिती, जलस्रोतांमधील पाणीसाठा आणि ग्रामीण भागातील परिस्थिती यांचा एकत्रित विचार करून दुष्काळप्रवण भाग निश्चित करण्याच्या दृष्टीने या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. पाऊस आणखी लांबल्यास पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गावनिहाय पाणी उपलब्धता, जलस्रोतांची स्थिती आणि भविष्यातील संभाव्य पाणीटंचाईचा आढावाही घेतला जाणार आहे. दुसरीकडे, पावसाअभावी चारा उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता असल्याने पशुधनाचा प्रश्न सरकारसमोर उभा राहणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील जनावरांची संख्या, उपलब्ध चारा आणि भविष्यात लागणाऱ्या चाऱ्याचे प्रमाण याची माहिती बैठकीत संकलित केली जाणार आहे. परिस्थिती गंभीर झाल्यास चारा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याचा मार्ग यामुळे मोकळा होणार आहे. खरीप पिकांचे नुकसान झाल्यास केवळ शेतकऱ्यांचेच नव्हे, तर ग्रामीण भागातील शेतमजुरांचेही उत्पन्न घटण्याची शक्यता आहे. शेतीची कामे कमी झाल्यास रोजगाराची मागणी वाढू शकते. त्यामुळे ग्रामीण रोजगाराची सद्यस्थिती आणि आगामी काळातील संभाव्य गरज याचाही आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे.

-----------

## विद्यार्थ्याच्या मृत्यूसाठी

परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे या तरुणाला हे टोकाचे पाऊल उचलण्यास भाग पाडले गेले. देशमुख हा एक हुशार विद्यार्थी होता, त्याने शालेय जीवनात अव्वल क्रमांक मिळवले होते आणि स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनी अनेकदा राष्ट्रध्वज फडकवण्याचा मान त्याला मिळाला होता. अशा विद्यार्थ्याच्या मृत्यूसाठी यंत्रणाच जबाबदार आहे, असे पवार म्हणाले. त्याच्या वडिलांचे चार वर्षांपूर्वी निधन झाले होते. तो अधिकारी बनावा, हे त्याच्या वडिलांचे स्वप्न होते. शिक्षणासाठी तो पुण्यात गेला होता आणि त्याची मोठी बहीण त्याच्या खर्चासाठी दरमहा १०,००० रुपये पाठवत असे. याला जबाबदार कोण? यंत्रणा जबाबदार आहे. एमपीएससीचे अध्यक्ष आणि भ्रष्टाचारात सामील असलेले लोक याला जबाबदार आहेत, असा आरोप त्यांनी केला. कोल्हापूर येथील सुशांत बल्लाळ या आणखी एका परीक्षार्थीच्या मृत्यूचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्महत्या न करण्याचे आवाहन केले. कृपया आत्महत्या करू नका. हा लढा आपला आहे. आपण हा लढा जिंकू आणि पारदर्शक परीक्षांसाठी लढा सुरूच ठेवू, असे ते म्हणाले. जेव्हा परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याबाबत माहिती द्यायची होती, तेव्हा एमपीएससी अध्यक्षांनी भेटण्याची वेळ दिली नाही; उलट, प्रश्नपत्रिका फुटलीच नाही असा दावा करणारा व्हिडिओही त्यांनी जारी केला होता. नंतर, जेव्हा गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास केला, तेव्हा प्रश्नपत्रिका फुटल्याचे उघड झाले. त्यामुळे, अध्यक्षांना या पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही, असे पवार म्हणाले.

--------------

## ऑक्टोबरमध्ये

त्याचा थेट परिणाम कर्जदारांच्या खिशावर होऊ शकतो. एसबीआय रिसर्चच्या अहवालानुसार, ऑक्टोबरमध्ये आरबीआय रेपो रेटमध्ये वाढ करण्याची शक्यता आहे. एसबीआय रिसर्चच्या अहवालात रेपो रेटबाबत महत्त्वाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या अहवालानुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ऑक्टोबरमध्ये रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉइंट्स वाढ करू शकते. इतकेच नाही तर डिसेंबरमध्येही आणखी २५ बेसिस पॉइंट्स वाढ होण्याची शक्यता अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजेच डिसेंबरपर्यंत रेपो रेटमध्ये एकूण ५० बेसिस पॉइंट्सची वाढ होण्याचा अंदाज आहे. रेपो रेट वाढण्यामागे महागाईचा दबाव हा महत्त्वाचा घटक ठरू शकतो. मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. कच्च्या तेलाचा दर १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेल्यास त्याचा परिणाम देशातील महागाईवर होण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाच्या किमती दीर्घकाळ वाढत राहिल्यास आगामी काळात महागाईचा दबाव आणखी वाढू शकतो. एसबीआय रिसर्चच्या अंदाजानुसार, कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये अपेक्षित घट झाली नाही तर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये महागाईचा दर ६.५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी आरबीआय कडून व्याजदर वाढण्याची शक्यता आहे. आरबीआय ने रेपो रेट वाढवल्यास त्याचा परिणाम बँकांच्या कर्जाच्या व्याजदरांवर होऊ शकतो. विशेषतः फ्लोटिंग रेटवर कर्ज घेतलेल्या ग्राहकांना याचा फटका बसण्याची शक्यता असते. व्याजदर वाढल्यास कर्जाचा इएमआय वाढू शकतो किंवा कर्जाचा कालावधी वाढू शकतो. मात्र, इएमआय मध्ये नेमकी किती वाढ होईल हे संबंधित बँकेने कर्जाच्या व्याजदरात किती बदल केला आहे, तसेच तुमच्या कर्जाच्या अटी काय आहेत यावर अवलंबून असेल.

------------

## १९ सप्टेंबरपासून आझाद

घोषणा केली आहे. १९ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानात उपोषणा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा शनिवारचा १५ वा दिवस होता. सरकारने त्यांच्या मागण्यावर ठोस निर्णय घेतल्याने त्यांनी आता मुंबईत धडक देण्याचा निर्णय घेतला आहे. अंतरवाली सराटीतून ते १५ सप्टेंबरला निघणार आहेत. पहिला मुक्काम बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे असेल. दुसरा मुक्काम अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंद्यात होईल. त्यानंतर तिसरा मुक्काम हडपसर येथे होईल. चौथा मुक्काम रायगड जिल्ह्यातील खोपोली किंवा कोपरखैरणे येथे असेल. तेथून पाचव्या दिवशी सकाळी १० वाजता मुंबईत आझाद मैदानात आमरण उपोषण सुरु करु. दिवसा मुक्कामाचे एकूण चार आणि पाचवा जाण्याचा असेल. प्रत्येक मुक्कामात १०० किमी अंतर आहे, असे जरांगे यांनी सांगितले. फडणवीस साहेब मराठ्यांना अडवणार नाहीत. त्यांना माहित आहे की गेल्यावेळी मराठे मुंबईत शांततेत आले आणि माघारी परतले. अंतरवाली येथून जाताना पोलिसांनी आम्हाला अडवण्याचा प्रयत्न करु नये. पोलिसांनी जर अडवल्यास शांतपणे बसून राहा. कोणताही हिंसाचार करायचा नाही. शांततेत पुढे जायचे आहे, असे आवाहन त्यांनी आंदोलनकर्त्यांना केले. मी तुम्हाला पुन्हा दिसेन की नाही माहित नाही. माझ्या समाजाच्या लेकरांना मोठे होऊ दिले जात नाही. गॅझेट असून ते लागू करत नाहीत. लोकांना नोंदी नसून आरक्षण दिले आहे. त्यासाठी मराठा समाजातील लेकरा बाळांसाठी आंदोलनात सहभागी व्हा, असे आवाहनही त्यांनी मराठा समाजाला केले. यावेळी ते भावूक झाल्याचे दिसून आले. नेत्याला मोठे करायचे की आपल्या लेकरा बाळांना हे आता मराठा समाजाने ठरवायचे आहे. प्रत्येक नेत्याने मराठा समाजाचे वाटोळे केले. त्यासाठी मराठ्यांनी त्यांची भूमिका आता स्पष्ट करावी. मुंबईला येण्यासाठी शक्य नसेल तर आंदोलनाच्या मार्गावर येऊन आशीर्वाद द्या, असे ते म्हणाले.

-----------

## मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर

उपक्रम, खाजगी बसेस, तसेच कंत्राटी वाहने, पर्यटक वाहने, टॅक्सी, ॲप-आधारित कॅब, ऑटोरिक्षा आणि कंत्राटी प्रवासी वाहतूक सेवा यांचा समावेश असेल. एमआयडीसी, कारखाने, कंपन्या आणि कंत्राटदार यांच्या कर्मचारी वाहतूक सेवांव्यतिरिक्त, ट्रक, टँकर, धोकादायक मालवाहू वाहने, गोदामे, वितरण केंद्रे आणि बंदरे यांच्या वाहतूक सेवांचाही समावेश केला जाईल. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र तरतुदी केल्या जातील. कर्तव्यावर रुजू होण्यापूर्वी अल्कोहोल चाचणी, नियोजित आणि अनियोजित अमली पदार्थ चाचणी, तसेच घटना किंवा वाजवी संशयाच्या आधारावर चाचणी घेतली जाईल. प्रशिक्षित कर्मचारी, प्रमाणित उपकरणे आणि एक डिजिटल रेकॉर्ड प्रणाली विकसित केली जाईल. महाराष्ट्र राज्यात अमली पदार्थांच्या प्राथमिक चाचणीसाठी प्रमाणित एक विशेष किट वापरण्यात येईल . यामुळे पॅकेज न उघडता संशयित पदार्थांची प्राथमिक चाचणी करणे शक्य होईल. गांजासह विविध अमली पदार्थांच्या चाचणीमुळे पुष्टीकरण होईल आणि आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. प्रताप सरनाईक यांनी असेही सांगितले की, या मोहिमेत समुपदेशन, उपचार आणि पुनर्वसन यावर काटेकोरपणे भर दिला जाईल. जर एखादा चालक धोक्यात असल्याचे आढळले, तर त्याला तात्पुरते कामावरून दूर केले जाईल आणि त्याच्या जागी दुसरा चालक उपलब्ध करून दिला जाईल. तपासाशी संबंधित वैयक्तिक माहितीची गोपनीयता देखील जपली जाईल. वाहन मालक, वाहतूक कंपन्या, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि कंत्राटदार यांच्या जबाबदाऱ्या निश्चित केल्या जातील. परिवहन, गृह, उद्योग, आरोग्य, सामाजिक न्याय आणि शिक्षण विभागांच्या समन्वयाने राज्य, जिल्हा आणि संस्थात्मक स्तरावर व्यवस्था केली जाईल. डिजिटल देखरेखीत चाचणी, प्रशिक्षण, उपकरणे, वैद्यकीय संदर्भ आणि अनुपालन यांचा आढावा घेतला जाईल. २०२६ ते २०२९ साठी एक टप्प्याटप्प्याने कृती योजना विकसित केली जात आहे.

-------------

## विजय मल्ल्या अजूनही

बँकांसोबतचा आपला वाद मिटला आहे, असा दावा त्याने केला होता. ईडीने म्हटले की, १४,१३१.६ कोटी रुपये मूल्याची जंगम आणि स्थावर मालमत्ता एसबीआयच्या नेतृत्वाखालील बँकांच्या समूहाला हस्तांतरित करण्यात आली होती. परंतु यामुळे मल्ल्यावरील मनी लॉंड्रिंगचे आरोप रद्द होत नाहीत किंवा ते मागे घेतले जात नाहीत.

-----------

## लातूरच्या इतिहासातील सर्वात

सरकारने अधिकाऱ्यांना पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल, असेही त्यांनी सांगितले. विमा कंपन्या, कृषी विभाग आणि महसूल विभाग यांच्याकडून स्वतंत्रपणे पाहणीचे काम सुरू झाले आहे. यापूर्वी कठीण प्रसंगात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे आणि यावेळीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तशीच भूमिका घेतली आहे. प्रत्यक्ष पंचनामे करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. लातूर जिल्ह्यासाठी वॉटर ग्रिडचा प्रस्तावही राज्य सरकारने जागतिक बँकेकडे सादर केला होता आणि आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर आगामी काळात या प्रकल्पाचे काम सुरू होईल अशी आशा आहे, असेही त्यांनी सांगितले.

---------

## पिकांवर रोटाव्हेटर फिरवू नका,

असे त्यांनी नमूद केले आहे. त्यांनी नुकतीच लातूर जिल्ह्याच्या चाकूर तालुक्यात खरीप पिकांच्या परिस्थितीची शेतीच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती व नुकसानीची माहिती घेतली. पाण्याअभावी झालेल्या पीक नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद करावी आणि आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या संकटात शेतकरी बांधवांनी खचून जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. पावसाने ओढ दिल्याने शेतकरी अडचणीत असून, सोयाबीन पीक ७० टक्के उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यासाठी सरकारने तातडीने पंचनामे करून युद्धपातळीवर शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला पीक नुकसानीचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

-----------

## ब्रिक्सच्या बैठकीत एकतर्फी शुल्क आणि

मूळ कारणे दूर करण्यासह अधिक सक्रिय सहभागाची गरज या जाहीरनाम्यात अधोरेखित करण्यात आली. तसेच, संवाद, चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय वाद शांततापूर्ण मार्गाने सोडवण्याच्या आपल्या कटिबद्धतेचा या गटाने पुनरुच्चार केला. ब्रिक्स देशांनी अशा बहुपक्षीय दृष्टिकोनाचा पुरस्कार केला जो महत्त्वपूर्ण जागतिक मुद्द्यांवर विविध देशांचे दृष्टिकोन आणि भूमिकांचा आदर करतो; तसेच आंतरराष्ट्रीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संवाद आणि सहकार्याच्या महत्त्वावर भर दिला. व्यापाराच्या बाबतीत, या गटाने एकतर्फी शुल्क आणि शुल्क-व्यतिरिक्त उपाययोजनांच्या वाढत्या वापराबाबत विशेषतः आंतरराष्ट्रीय व्यापार विस्कळीत करणाऱ्या आणि च्या नियमांशी विसंगत असलेल्या उपाययोजनांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरोधात असलेल्या एकतर्फी बळजबरीच्या उपाययोजनांचाही या जाहीरनाम्यात निषेध करण्यात आला. संघर्ष निवारणावर भर देण्यासोबतच, या जाहीरनाम्यात अणु-धोके आणि संघर्षाचा वाढता धोका याबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली. आंतरराष्ट्रीय शांतता आणि स्थैर्याच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग म्हणून, संघर्ष रोखण्यासाठी आणि त्यांची मूळ कारणे दूर करण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचे महत्त्व ब्रिक्स देशांनी अधोरेखित केले. आंतरराष्ट्रीय वाद शांततापूर्ण मार्गाने सोडवण्याच्या आपल्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार करत, ब्रिक्स देशांनी संवाद, चर्चा आणि मुत्सद्देगिरीचा आग्रह धरला. महत्त्वपूर्ण जागतिक मुद्द्यांवर विविध देशांचे दृष्टिकोन आणि भूमिका विचारात घेणाऱ्या बहुपक्षीय दृष्टिकोनालाही या गटाने पाठिंबा दिला. आर्थिक सहकार्याच्या बाबतीत, ब्रिक्स देशांमधील सीमापार देयकांसाठी व्यावहारिक उपाय शोधण्याच्या उद्देशाने चर्चा सुरू ठेवण्यास ब्रिक्स देशांनी प्रोत्साहन दिले. अशा प्रकारे, 'नवी दिल्ली जाहीरनाम्या'ने संवाद, मुत्सद्देगिरी, बहुपक्षीयता आणि संघर्ष निवारण यांवर भर दिला; त्याच वेळी एकतर्फी व्यापार उपाययोजना, बळजबरीच्या कारवाया, अणु-धोके आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेपुढील आव्हाने यांबाबत चिंता व्यक्त केली.

----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात



पिंपळवंडी :-अखंड हरिनाम सप्ताह गांधनवाडी समारोपास ह.भ.प.महादेवानंदभारती महाराज ऋषिकेश महाराज,जि.प.सदस्या अश्विनी जरांगे,सरपंच अशोक जेधे, उपसरपंच भाऊसाहेब ससे,माऊली पाचपुते,भरत कुमखाले,बाबु जगताप,छगन पाचपुते,सचिन पिसाळ,सौ.ठकुबाई ससे गुणिजन व गावकरी.

### अलोका वेलफेयर च्या वतीने स्वामी विवेकानंद विद्यालयात ५०० विद्यार्थ्यांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

अलोका वेल्फेअर फाउंडेशन तर्फे मोफत आरोग्य शिबिर विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते.आरोग्य तपासणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र सदोळा येथील डॉ. आफ्रिन मुल्ला,डॉ.बिसेन




विभासिंह,तसेच श्रीमती वारभंग मीना,कल्याणी साळवे,गरोळे जी.एम. राठोड जीपी,पवार आर.आर,औटी ए.एस, केजी साळवे,पी एस अंभुरे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी करून मोलाचे सहकार्य केले. याप्रसंगी स्वामी विवेकानंद विद्यालय माजलगाव येथील शाळेचे मुख्याध्यापक करांडे राजेंद्र व शिक्षक सहकारी यांनी आरोग्य तपासणी शिबिरास सहकार्य केले. हा सामाजिक कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी अलोका वेलफेअर फाउंडेशन चे डायरेक्टर जयपाल साधुराव साळवे,ट्रस्टी साधूराव साळवे आणि संस्थेचे सेक्रेटरी चेतन निसर्गंध,प्रोजेक्ट मॅनेजर लोकेश जाधव,कम्युनिटी मोबिलाइझर आनंद साळवे, डाटा कलेक्टर अमोल पतंगे, वॉलेंटियर नवमान सिद्धिकी,यांनी परिश्रम घेतले.

### सेवा निवृत्त शिक्षक पोपटराव भोसले यांचे निधन

आष्टी। प्रतिनिधी




आष्टी शहरातील सेवा निवृत्त शिक्षक पोपटराव गणपतराव भोसले वय ८२ यांचे मंगळवार दि ८ सप्टेंबर रोजी पहाटे त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी १२ वाजता आष्टी शहरातील शेकापूर रोड वरील खंडोबा मंदिर परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. राजेंद्र भोसले, शिक्षक रविंद्र भोसले, पंचायत समितीचे ए पी ओ राहूल भोसले यांचे ते वडील होते.

### विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

सर्जा-राजाला अंघोळ घालून पोळ्याची तयारी सुरू असताना, जनावरांसाठी कडबा कुट्टी करताना विजेचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना आष्टी तालुक्यातील चिखली येथे गुरुवारी सकाळी घडली.शहाजी लक्ष्मण आवारे (वय ४४) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.पोळ्याच्या दिवशी ही घटना घडल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. शहाजी आवारे यांनी सकाळीच बैलांना अंघोळ घातली. पूजेची तयारी सुरू असताना जनावरांना चारा टाकण्यासाठी ते घराजवळील कडबा कुट्टी यंत्राकडे गेले. त्यावेळी त्यांना विजेचा धक्का बसला. आष्टी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

# बीड जिल्हा प्रशासन व पोलिसांचा वाळूमाफियांना दणका!

## वाळूमाफिया सुभाष करे याच्यावर 'एमपीडीए'; हर्सूल कारागृहात रवानगी





बीड / माजलगाव :

जिल्ह्यातील अवैध धंदे आणि वाळू माफियांविरुद्ध बीड जिल्हा पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला असून माजलगाव तालुक्यातील एका कुख्यात वाळूमाफियाविरुद्ध 'एमपीडीए' (झोपडपट्टीदादा प्रतिबंधक कायदा) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे. पुरुषोत्तमपुरी येथील वाळूमाफिया सुभाष बबन करे (वय ३०) याला स्थानबद्ध करून छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या या धडक कारवाईमुळे अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

गंभीर स्वरूपाचे ४ गुन्हे दाखल

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुभाष बबन करे याच्याविरुद्ध माजलगाव ग्रामीण व इतर पोलीस ठाण्यांत खुनाचा प्रयत्न करणे, जबर दुखापत करणे, गौण खनिज वाळूची अवैध चोरी, साठा व वाहतूक करणे, सरकारी कामात अडथळा आणणे, बेकायदेशीर मंडळी जमवून मारामारी करणे, नुकसान करणे तसेच शिवीगाळ व जिवे मारण्याच्या धमक्या देणे यांसारखे एकूण ४ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

### अवैध धंदे करणाऱ्यांवर 'मोक्का' व 'एमपीडीए'चा बडगा उगारणार

जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक, गुटखा विक्री, हातभट्टीची दारू, बेकायदेशीर जुगार, लॉटरी चालवणारे, खंडणी बहाद्दर, गुंड तसेच जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिला आहे. गरज पडल्यास अशा गुन्हेगारांवर 'एमपीडीए' आणि 'मोक्का' अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### पोलीस पथकाची कामगिरी

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत (भा.पो.से.), अप्पर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी (माजलगाव) श्री. अशोक अनंत्रे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये माजलगाव ग्रामीणचे पोलीस निरीक्षक विजयकुमार रामोड, पोउपनि सचिन शिंदे, संजय राठोड तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि महेश विघ्ने, सपोउपनि अभिमन्यू औताडे, बप्पासाहेब घोडके, महेश जोगदंड, गणेश मराडे, बबन सलगर व बिभीषण चव्हाण यांनी सहभाग घेतला.

त्याच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारी कारवायांमुळे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी पोलीस अधीक्षक बीड यांच्यामार्फत त्याच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ११ सप्टेंबर २०२६ रोजी मंजुरी दिली. मंजुरी मिळताच माजलगाव ग्रामीण पोलिसांनी सुभाष करे यास ताब्यात घेऊन हर्सूल कारागृह (छत्रपती संभाजीनगर) येथे दाखल केले.

# गेवराईत जुगार अड्ड्यावर पोलिसांची धडक कारवाई; १४ जणांना अटक

## परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाची कामगिरी



गेवराई (प्रतिनिधी):

गेवराई परिसरातील जतेगाव रोडवर सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर गुरुवारी (१० सप्टेंबर) रात्री उशिरा पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक (डीवायएसपी) भारत पांढरे यांच्या पथकाने केलेल्या या धडक कारवाईत १४ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम, वाहने आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ७२ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, जतेगाव रोडवरील एका ठिकाणी काही व्यक्ती एकत्र येऊन जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे १० सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ११.३० वाजेच्या सुमारास परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने पंचांना सोबत घेऊन सदर ठिकाणी अचानक छापा टाकला. त्यावेळी आरोपी गोलाकार बसून जुगार खेळताना रंगेहात मिळून आले.

पोलिसांनी घटनास्थळावरून राम बाबुराव चव्हाण, सय्यद फय्याज मोहिमद, अशोक गोनिनाथ भावले, संतोष अप्पासाहेब नेवाळे, शेख तौफीक इस्माईल कुरेशी, अशोक सरदारराम धापसे, जमील सलीम शेख, जमील कादर कुरेशी, गणेश गोसाव चव्हाणकर, कृष्णा अशोक खरात, अमित अर्जुन पाडाळे, शेख आवेज हाफीज, संतोष दशरथ पाटील आणि करण गीताराम नराडे या १४ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ च्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

८ दुचाकी व १४ मोबाईल जप्त

कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून विविध कंपन्यांचे १४ मोबाईल फोन, ८ मोटारसायकली आणि रोख रक्कम असा एकूण अंदाजे ६ लाख ७२ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख तसेच गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन डीवायएसपी भारत पांढरे व त्यांच्या पथकातील अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली. या प्रकरणाचा पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत.

## पान ६ वरुन...

### कर्जबाजारीपणाला कंटाळून

वारंवार होणारी मागणी व तगादा, तसेच कमी वेतनात कुटुंबाचा खर्च भागविण्याची धडपड यामुळे ते मानसिक तणावात असल्याचे सांगण्यात येत आहे. याच विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक स्वरूपात समोर आले आहे.घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणेने घटनास्थळी धाव घेतली असून, पोलिसांकडून पुढील तपास पोहे का तागड व अशोक तांबे हे करत आहेत.

### अंबाजोगाईत स्लॅब भरताना

मुलगी असून कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच होती. तर, यशवंत वाघमारे यांच्या दोन लहान मुलांच्या डोक्यावरील पित्याचं छत्र हरपलं आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी उंचावर जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेने पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. कष्टकऱ्यांचे असे बळी जाणे अत्यंत वेदनादायी आहे.

### आष्टीतील लोकन्यायालयात ८७

यांच्यासह वकील बांधव, न्यायालयीन कर्मचारी आणि पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पॅनल ॲडव्होकेट म्हणून एम. बी. दाणी व आर. बी. पोकळे यांनी काम पाहिले.

कोर्ट आवारात येऊन साधला पक्षकारांशी संवाद

राष्ट्रीय लोक अदालतीसाठी तालुक्याच्या विविध भागातून पक्षकार मोठ्या संख्येने आले होते. त्यात अनेक वयोवृद्ध तसेच शारीरिक त्रास असल्याने न्यायालयात न्यायमूर्तींसमोर येणे शक्य नसलेल्या व्यक्तीही होत्या. अशा कोर्ट आवारातील वाहनात बसून असलेल्या पक्षकारांशी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश ए. बी. निवारे मॅडम यांनी स्वतः कोर्ट आवारात येऊन संवाद साधला व त्यांच्याकडून माहिती घेत खटल्याशी संबंधित बाबींची खातरजमा केली.

### तहसीलदार चंद्रकांत शेळके

उपलब्ध जुन्या नोंदी , वंशावळ , महसुली पुरावे तसेच इतर संबंधित कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात आले . प्राप्त अर्जांची प्राथमिक छाननी करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबतही नागरिकांना माहिती देण्यात आली.

या शिबिरास मंडळ अधिकारी दीपाली आघाव , ग्राम महसूल अधिकारी प्रशांत नलावडे , निखिल राऊत , प्रदीप गर्जे , ग्रामपंचायत अधिकारी विलास काकडे , सुजित बोराडे , सहाय्यक कृषी अधिकारी बाबासाहेब सारूक , येळंबघाटचे सरपंच कदम , सानपवाडीचे सरपंच , जैताळवाडीचे सरपंच हनुमान केसकर , अजय आमटे , सचिन आमटे तसेच मंडळातील पोलिस पाटील बालाजी भटे , मिरा काकडे , सारिका केदार , संतोष भोसले , परमेश्वर धस , सचिन शेळके , वैभव काटकर , गफार पठाण , गणेश डांबे , तुषार खामकर , सुनील सानप तसेच येळंबघाट मंडळातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लिंबागणेश येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे मार्गदर्शन :- लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयातही आज कुणबी प्रमाणपत्रासाठी विशेष मार्गदर्शन व अर्ज स्वीकृती शिबिर घेण्यात आले . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात लिंबागणेश महसूल मंडळातील अधिकारी , कर्मचारी व ग्रामस्थ सहभागी झाले . कुणबी , मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली वंशावळ , महसुली पुरावे , शालेय दाखले , जन्म-मृत्यू नोंदी , रहिवासी पुरावा , जुन्या महसुली नोंदी , हैदराबाद गॅझेटमधील नोंदी , विहित नमुन्यातील स्वयंघोषणापत्र व शपथपत्र आदी कागदपत्रांबाबत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मार्गदर्शन केले.

**आठ गावांचे रेकॉर्ड जळाल्याने नोंदी शोधण्याचे आव्हान –**

दरम्यान, लिंबागणेश मंडळातील आठ गावांचे जुने रेकॉर्ड जळाल्याने नागरिकांना आवश्यक पुरावे उपलब्ध करून देताना मोठे आव्हान निर्माण झाले असल्याचा मुद्दा डॉ . गणेश ढवळे , महारूद्र वाणी व मुळुकवाडीचे सरपंच रामकिसन कदम यांनी उपस्थित केला . संबंधित गावांतील जुन्या नोंदींचा पर्यायी स्रोत शोधून नागरिकांना पुरावे उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात , अशी मागणी त्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडे केली.जिल्ह्यातील या विशेष मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त जी . श्रीकांत , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरिष कल्पना कृष्णराव धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , नोडल अधिकारी मनोज घोडे पाटील तसेच बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल यंत्रणेकडून कार्यवाही सुरू आहे. नागरिकांनी आपल्या कुटुंबातील उपलब्ध जुने महसुली व इतर शासकीय पुरावे घेऊन विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा आणि कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कार्यवाही पूर्ण करून घ्यावी , असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बुखारी प्राथमिक उर्दू शाळेची क्रीडा क्षेत्रात दमदार कामगिरी



### अंडर-१४ बुद्धिबळ स्पर्धेत फरहीन माजेद शेख तालुक्यात प्रथम; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेतील अंडर-१४ बुद्धिबळ स्पर्धेत बुखारी प्राथमिक उर्दू शाळा, माजलगावच्या इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी फरहीन माजेद शेख हिने उत्कृष्ट कामगिरी करत तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.तिची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालय (इंदोर हॉल), माजलगाव येथे दि.०९ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धेत फरहीनने बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर तालुक्यात अव्वल स्थान मिळविले. उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थिनीने बुद्धिबळासारख्या बौद्धिक खेळात उल्लेखनीय यश मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळविल्याने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.फरहीनच्या या यशासाठी बुखारी प्राथमिक उर्दू शाळेचे मुख्याध्यापक इरफान सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्रीडा शिक्षक युसुफ इनामदार व सहाय्यक शिक्षक अरीश सय्यद यांनी विशेष मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.फरहीनच्या या उल्लेखनीय यशाबद्दल बुखारी एज्युकेशनल सोसायटीचे अध्यक्ष अजहर नाईक,सचिव खुर्शीद नाईक व सहसचिव इमरान नाईक यांनी तिचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनीच्या यशामुळे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# चातुर्मास उत्सवानिमित्त सोमवारी ह. भ. प. पांडुरंग रांजवण महाराज यांचे प्रवचन

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील स्वराज्य नगर येथील ज्ञानेश्वरी अभ्यासक श्री.ह.भ.प. भागवताचार्य माधव महाराज डाके यांचयाकडे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही चातुर्मास उत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात व आनंदात सुरू आहे. या चातुर्मास उत्सवात प्रत्येक सोमवारी रात्री ८.०० ते ९.०० या वेळेत बीड जिल्ह्यातील नामवंत,प्रज्ञावंत ज्ञानेश्वरी अभ्यासक व कीर्तनकार महाराजांच्या रसाळ व प्रासादिक प्रवचन सेवा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

यावर्षीच्या चातुर्मास उत्सवातील प्रतिसोमवार प्रवचन सेवा दिनांक १४ सप्टेंबर २०२६ सोमवार रोजी ह भ प पांडुरंग महाराज रांजवण आहेर वडगाव यांची प्रवचन सेवा आयोजित करण्यात आली आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके या फेसबुक चॅनल वरती केले जाणार आहे. याची भाविकांनी नोंद घ्यावी. या प्रवचन सेवेचा लाभ बीड शहर व परिसरातील परिसरातील भाविक भक्तांना होत असुन जास्तीत जास्त भाविकांनी मोठ्या संख्येने सदरील प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक श्री.ह.भ.प. माधव महाराज डाके काठवडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# संघर्षाच्या वाटेवरून 'स्पर्श डेव्हलपर्स'पर्यंत; प्रभु पाटील यांची प्रेरणादायी भरारी.!

## लेबर म्हणून काम करणारे प्रभू पाटील बनले यशस्वी कॉन्ट्रॅक्टर; 'स्पर्श डेव्हलपर्स'च्या माध्यमातून पुण्यात रिअल इस्टेट क्षेत्रात निर्माण केली विश्वासाची ओळख

युसूफवडगांव । प्रतिनिधी

हातात साधनं कमी, परिस्थिती सामान्य आणि डोळ्यांसमोर मात्र मोठी स्वप्नं अशा परिस्थितीत १९९७ मध्ये पुण्यात सायकलवरून सुरू झालेला श्री. प्रभू पाटील यांचा संघर्षाचा प्रवास आज यशस्वी कॉन्ट्रॅक्टर आणि उद्योजक म्हणून ओळख निर्माण करण्यापर्यंत पोहोचला आहे. लेबर म्हणून काम करताना बांधकाम क्षेत्रातील बारकावे आत्मसात करून त्यांनी मेहनत, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर स्वतःचे विश्व उभे केले.

संघर्षाला कर्तृत्वाची जोड

लेबर म्हणून काम करताना मिळालेला अनुभव आणि प्रत्यक्ष कामाची जाण त्यांच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाची ठरली. प्रत्येक अडचणीला संधी मानत त्यांनी हळूहळू जबाबदाऱ्या स्वीकारल्या आणि कॉन्ट्रॅक्टर म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. हा प्रवास एका रात्रीत घडलेला नसून त्यामागे अनेक वर्षांची मेहनत, संघर्ष आणि परिस्थितीशी दोन हात करण्याची जिद्द आहे.



'स्पर्श डेव्हलपर्स'च्या माध्यमातून नवी भरारी

बांधकाम क्षेत्रातील अनुभवाच्या जोरावर प्रभू पाटील यांनी 'स्पर्श डेव्हलपर्स'च्या माध्यमातून पुण्यात रिअल इस्टेट क्षेत्रात पाऊल ठेवले. गुणवत्ता, पारदर्शकता, भक्कम बांधकाम आणि ग्राहकांचा विश्वास यांना प्राधान्य देत व्यवसायाची वाटचाल सुरू ठेवली. त्यामुळे 'स्पर्श डेव्हलपर्स'च्या माध्यमातून रिअल इस्टेट क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्याच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे.

२०१९ नंतर त्यांच्या मेहनतीला अधिक ठोस स्वरूप मिळाले. स्वतःची वास्तू, वाढता व्यवसाय आणि समाजातील वाढता सन्मान हे त्यांच्या दीर्घ संघर्षाचे फलित आहे. २०२५-२६ पर्यंत व्यवसायाने आणखी विस्तार घेतला असून भविष्यात मोठी स्वप्ने घेऊन ते पुढे जात आहेत.

यश मिळाले; मात्र माणुसकी विसरले नाहीत!

व्यवसायात यश मिळाल्यानंतरही सामाजिक बांधिलकी जपणे ही प्रभू पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाची विशेष ओळख आहे. गरीब कुटुंबातील मुलीच्या विवाहासाठी संसारोपयोगी साहित्याची मदत करणे, तसेच अनाथाश्रमातील मुलांना कपडे, भोजन आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे, अशा माध्यमातून ते सामाजिक योगदान देत आहेत.

स्वतः संघर्षातून पुढे आल्याने गरजूंच्या अडचणींची जाणीव ठेवून त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे त्यांचा प्रवास हा केवळ लेबर ते उद्योजक होण्याचा नसून संघर्षातून यश आणि यशातून समाजसेवा असा प्रेरणादायी प्रवास ठरला आहे. १९९७ ची सायकल... लेबरचा संघर्ष... कॉन्ट्रॅक्टर म्हणून कर्तृत्व... 'स्पर्श डेव्हलपर्स'च्या माध्यमातून उद्योजकतेची भरारी... आणि यशासोबत समाजसेवेची जपलेली नाळ, असा प्रभू पाटील यांचा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. स्वतः उभं राहणं हे यश आहे; पण स्वतः उभं राहून दुसऱ्याला उभं करणं हे खरं मोठेपण आहे, या विचाराला आपल्या कृतीतून प्रत्यक्षात आणणाऱ्या प्रभू पाटील यांच्या पुढील वाटचालीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

cmyk



# कर्जमाफीबाबतच्या सरकारच्या निर्णयाचे स्वागत, पण नियमित कर्जदारांनाही दिलासा मिळावा- अजित नवले

पुणे / प्रतिनिधी

राज्य सरकारने मयत शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमाफी देण्याचा तसेच वनजमीनधारक शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयाचे किसान सभेने स्वागत केले आहे. किसान सभेच्या काही मागण्या मान्य केल्या असल्या तरी नियमित कर्जदारांना दोन लाखांपर्यंत लाभ द्यावा, ही प्रमुख मागणी अद्यापही प्रलंबित आहे. सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी पुन्हा एकदा केली आहे.

कर्जमाफी योजनेंतर्गत मयत शेतकऱ्यांच्या वारसांना सुद्धा कर्जमाफीचा लाभ द्यावा. वनजमीनधारक शेतकऱ्यांचीही कर्जमाफी करावी आणि ज्यांच्या अंगठ्याचे ठसे उमटत नाहीत. यामुळे त्यांचे ॲग्रीस्टॅक निघत नाहीत. तांत्रिक अडचणी आहेत. त्यांनासुद्धा कर्जमाफीपासून वंचित ठेवू नये. या मागण्या किसान सेभेने आंदोलनाद्वारे केल्या होत्या. पुणे येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर या मागण्या मान्य करण्यात



आल्या होत्या. त्यानुसार शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या मागण्या मान्य असून त्याची अंमलबजावणी राज्य सरकारने सुरु केली आहे. याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन. त्यांनी मान्य मागण्यांची अंमलबजावणी सुरु केली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो, असे नवले यांनी म्हटले आहे. यासोबतच नियमित कर्जदारांनाही लाभ दिला पाहिजे. जे शेतकरी वंचित राहिलेले आहेत; त्यांच्या अटी- शर्ती काढून त्यांना कर्जमाफी द्यावी. त्याचबरोबर सिंचन योजनांच्या ज्या लाभार्थी संस्था आहेत; त्यांच्या कर्जमाफीचा निर्णय यापूर्वीच झाला आहे. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. या मागण्या किसान सभेने केल्या आहेत. या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन तिन्ही मंत्र्यांनी दिले होते. त्याची अंमलबजावणी सरकारने करावी. अशी मागणी त्यांनी केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत मृत/वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या वारसाबाबत उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी दूर करुन पात्र शेतकऱ्यांना काही अटींच्या अधीन राहून लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यासाठी मयत शेतकऱ्यांच्या वारसांनी महसूल दप्तरी त्यांच्या नावाची नोंद करुन ॲग्रीस्टॅक प्रणालीवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. शेतकऱ्यांच्या संमतीने बँकेने कर्ज दिलेल्या वारसांची महसूल दप्तरी तसेच बँकेच्या रेकॉर्डला नोंद करुन ॲग्रीस्टॅक प्रणालीवर नोंदणी करणे अनिवार्य राहील, असे शासन निर्णयात नमूद केले आहे.

# 'या' पक्षांच्या संगोपनातून मिळणार कोंबड्यांपेक्षा अधिक उत्पन्न!



शेतीपूरक व्यवसायाचे सध्या वेगवेगळे पर्याय शेतकऱ्यांसमोर येत आहेत, जे जास्त फायदेशीर आणि उपयुक्त आहेत. असाच एक व्यवसाय आहे गिनी फॉल्स फार्मिंग. गिनी फॉल्स यांना टर कोंबडी किंवा ऑस्ट्रेलियन टर्की या नावाने सुद्धा ओळखतात.

देशात शेतकरी मोठ्या प्रमाणात गिनी फॉल्स फार्मिंग करत आहेत, यामुळे त्यांना चांगले पैसे मिळत आहेत. गिनी फाऊल या पक्षांना जास्त देखभालीची आवश्यकता नसते, त्यामुळे त्यांच्या संगोपनासाठी कमी खर्च येतो. गिनी फॉउलचे मांस आणि अंडी कोंबडीपेक्षा जास्त किंमतीला विकली जातात, जी तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकरी गिनीफाऊलचे मोठ्या प्रमाणात पालनपोषण करत आहेत, ज्यामुळे त्यांना चांगले पैसे मिळत आहेत. हे पक्षी एक उत्तम रखवालदार म्हणून सुद्धा ओळखले जाते. कोंबड्यांना साप, मुंगुस, घूस यापासून वाचवण्यासाठी या पक्षांचा चांगला उपयोग होतो. तुम्हालाही कमी खर्चात चांगला कमाईचा व्यवसाय करायचा असेल तर गिनी फॉल फार्मिंग चांगला पर्याय आहे. गिनी फाऊल आपल्या शरीराला हवामानानुसार अनुकूल बनवतो, त्यामुळे थंडी, उष्णता आणि पावसाचा त्यावर काहीही परिणाम होत नाही. कोंबडीच्या तुलनेत हा पक्षी क्वचितच हंगामी रोगांचा बळी पडतो. गिनी फॉउलचे मांस आणि अंडी कोंबडीपेक्षा चवदार असतात. बाजारात या पक्षाचे एक अंडे २० रुपये या किमतीला विकले जाते. गिनी फाउलचे संगोपन करण्यापूर्वी, तुमच्याकडे त्याच्या ओळखीची अचूक माहिती असणे आवश्यक आहे. गिनी फाऊल त्यांच्या तुरयावरून ओळखले जातात. मादी गिनी फॉउलचा तुरा नरापेक्षा लहान असते. जर तुम्ही याला व्यवसाय म्हणून फॉलो करण्याचा विचार करत असाल, तर तुम्ही ५० गिनी फॉउलसह देखील व्यवसाय सुरु करू शकता.गिनी फाउलच्या अंड्याचे कवच खूप जाड असते, त्यामुळे ते तोडण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. त्याच वेळी, त्याची अंडी इतर पक्ष्यांच्या अंड्यांपेक्षा सुमारे दोन ते अडीच पट जाड असते आणि ती सहजासहजी खराब होत नाही. ही अंडी १५ ते २० दिवस टिकवून ठेवता येतात.

वर्षातून १०० अंडी : गिनी फाऊल एका वर्षात सुमारे १०० अंडी घालतात. बाजारात एका अंड्याचा भाव १७ ते २० रुपये असून मांसाला चांगली मागणी आहे. तुम्ही हा व्यवसाय ५० गिनी फॉउलसह सुरू केल्यास, तुम्ही एका वर्षात कुक्कुटपालनापेक्षा ४ पट अधिक कमाई करू शकता.

# चवळी लागवड : कमी खर्चात घ्या भरघोस उत्पादन!

महाराष्ट्रात चवळी लागवड ही खरीप आणि उन्हाळी दोन्ही हंगामांत यशस्वीरीत्या केली जाते. हे पीक जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी उत्तम मानले जाते.

हवामान आणि जमीन :चवळीच्या पिकासाठी उष्ण आणि दमट हवामान उत्तम मानले जाते.

जमीन: मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ दरम्यान असावा.

सुधारित वाण :कोकण सदाबहार: हिरव्या शेंगांसाठी उत्तम वाण. पुसा कोमल: कीड आणि रोगांना बळी न पडणारी जात. पुसा फाल्गुनी: कमी दिवसांत (६०-६५ दिवस) तयार होणारी जात. सी -१५२: धान्यासाठी उत्तम मानली जाणारी जात.

पेरणी आणि बियाणे : खरीप: जून ते जुलैचा पहिला आठवडा. उन्हाळी: फेब्रुवारी ते मार्च. बियाण्याचे प्रमाण: हेक्टरी १२ ते १५ किलो बियाणे लागते. अंतर: दोन ओळींत ४५ सेंमी आणि दोन रोपांत १५ सेंमी अंतर ठेवावे. बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थिराम किंवा कॅप्टन, आणि १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियम जिवाणू संवर्धन लावावे.

खत आणि पाणी व्यवस्थापन :जमिनीची मशागत करताना हेक्टरी ५ ते ६ टन शेणखत मिसळावे. पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे. खरीप हंगामात पावसाच्या अंदाजानुसार पाणी द्यावे. उन्हाळी पिकासाठी जमिनीच्या प्रकारानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

काढणी आणि उत्पादन :भाजीच्या शेंगांसाठी पेरणीनंतर ४५ ते ५० दिवसांत पहिली काढणी करता येते.

धान्यासाठी शेंगा पूर्ण वाळल्यावर (७५ ते ९० दिवसांत) काढणी करावी.

उत्पादन: हिरव्या शेंगांचे उत्पादन हेक्टरी ८० ते १०० क्विंटल, तर धान्याचे उत्पादन १० ते १५ क्विंटलपर्यंत मिळते.



# शेवंतीची यशस्वी शेती: लागवड ते भरघोस उत्पादन

शेवंती ही भारतातील एक अत्यंत लोकप्रिय आणि सुंदर फुलांची शेती आहे. योग्य नियोजन आणि काळजी घेतल्यास शेवंतीच्या लागवडीतून चांगले उत्पन्न मिळवता येते.शेवंतीच्या फुलांच्या लागवडीची संपूर्ण माहिती आज आपण पाहणार आहोत. १. हवामान आणि जमीन : हवामान: शेवंतीच्या चांगल्या वाढीसाठी थंड आणि कोरडे हवामान उपयुक्त ठरते. अति उष्णता किंवा जास्त पाऊस या पिकासाठी घातक ठरू शकतो. जमीन: चांगल्या निचऱ्याची मध्यम ते भारी, कसदार जमीन (कि ६.५ ते ७.५) योग्य असते. पाणथळ जमिनीमध्ये झाडांची मुळे कुजण्याचा धोका असतो.

२. प्रमुख जाती : पिवळ्या रंगाच्या: राजा, इंदिरा, अप्सरा, चंद्रा. पांढऱ्या रंगाच्या: कस्तुरी, पांढरी रेवडी, बर्फी.लाल/गुलाबी रंगाच्या: लालपरी, शामल, नीलिमा.

३. पूर्वमशागत आणि लागवड पूर्वमशागत: जमीन १-२ वेळा उभी-आडवी नांगरून घ्यावी. प्रति एकर १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत मातीत मिसळावे. गादीवाफे : जमिनीचा चांगला निचरा होण्यासाठी गादीवाफे तयार करावेत.लागवडीची वेळ: जून ते जुलै (पावसाळ्यात) किंवा ऑगस्ट महिन्यात लागवड



करणे सर्वात उत्तम मानले जाते. अंतर: दोन रोपांमध्ये ३० सेमी ३० सेमी किंवा ४५ सेमी ३० सेमी अंतर ठेवावे. ४. खत आणि पाणी व्यवस्थापन पाणी: लागवडीनंतर लगेचच हलके पाणी द्यावे. पावसाळ्यात गरजेनुसार, तर हिवाळ्यात ७ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.खत व्यवस्थापन: लागवडीच्या वेळी: नत्र, स्फुरद आणि पालाश (छझघ) योग्य प्रमाणात द्यावे.लागवडीनंतर ३० ते ४५ दिवसांनी: पुन्हा हलका नत्राचा (णीशर) हप्ता द्यावा.

५. महत्त्वाच्या कृती: शेंडा खुडणे : लागवडीनंतर ३ ते ४ आठवड्यांनी झाडाचा मुख्य शेंडा खुडावा. यामुळे झाडाला अधिक फांद्या फुटतात आणि फुलांचे उत्पादन वाढते. आधार देणे: झाडाला खूप फुले आल्यावर ते कोलमडू नये म्हणून बांबूच्या काठ्यांचा किंवा सुतळीचा आधार द्यावा. ६. रोग व कीड नियंत्रण : मावा आणि थ्रिप्स : फुलांचा आणि पानांचा रस शोषतात. यांच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड किंवा डायमेथोएटची फवारणी करावी. तांबेरा आणि काळा ठिपका रोग: पावसाळ्यात पानांवर डाग पडतात. यासाठी मँकोझेब किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ची फवारणी करावी. ७. काढणी आणि उत्पादन : काढणी: लागवडीनंतर साधारण ३ ते ४ महिन्यांत फुले तयार होतात. फुले पूर्ण उमलण्यापूर्वी (अर्धी उमललेली असताना) सकाळी किंवा संध्याकाळी तोडावीत. उत्पादन: चांगल्या व्यवस्थापनाखाली प्रति एकर ६ ते ८ टन फुलांचे उत्पादन मिळू शकते.




## महत्वाच्या घटना

१५९८ : फ्रांस चे शासक हेनरी चतुर्थ (क्शपी खत) यांनी इसाई धर्माचा नांत चा प्रख्यात आदेश जारी केला.
१७८४ : रेगुलेटिंग क्टच्या दुर्बलतेवर मात करण्यासाठी आणि ब्रिटिशांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ब्रिटीश संसदेने पिट्स इंडिया क्ट पास केला.
१८९८ : हॅनीबल गुडविन यांनी सेल्यूलॉइड फोटोग्राफिक फिल्म चे पेटंट घेतले.
१९१३ : साली ब्रिटीश धातुशास्त्रज्ञ हॅरी ब्रेअर्ली यांनी स्टेनलेस स्टीलचा आविष्कार केला.
१९२२ : लीबीयातील अझिजीया येथे ५७.२ओ सेल्सिअस ही जगातील आजवरच्या सर्वाधिक तापमानाची नोंद झाली.
१९४८ : ऑपरेशन पोलो - विलीनीकरणासाठी भारतीय सैन्याने हैदराबादवर चढाई केली.
१९८५ : सुपर मारियो गेम जपान मध्ये प्रकाशित झाला.
१९८९ : आर्चबिशप डेसमंड टुटू यांनी वर्णद्वेषी धोरणाला विरोध करण्यासाठी दक्षिण अफ्रिकेत विशाल मोर्चा काढला.
१९९६ : महिला आणि बालकल्याणासाठी लक्षणीय कामगिरी बजावणार्या महिलेला देण्यात येणारा 'श्रीमती जानकीदेवी बजाज पुरस्कार' ज्येष्ठ समाजसेविका आणि स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्या श्रीमती इंदुमती पारिख यांना देण्यात आला.
२००० : चीनच्या शेनयांग येथे १ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २००० दरम्यान खेळण्यात आलेली २४-खेळाडूंची श्रेणी दतख ची बुद्धिबळ स्पर्धा म्हणजेच फिड वर्ल्ड कप विश्वनाथ आनंद यांनी जिंकला
२००३ : मेंडोलिन वादक यू. श्रीनिवास यांना राष्ट्रीय कुमार गंधर्व पुरस्कार जाहीर.
२००३ : ज्येष्ठ गायक पं. दिनकर कैकिणी यांना तानसेन यांना राष्ट्रीय कुमार गंधर्व पुरस्कार जाहीर.
२००८ : दिल्ली येथे झालेल्या बॉम्बस्फोटांच्या मालिकेत ३० जण ठार तर सुमारे १३० जण जखमी झाले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४५ : साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ब्रिटीश अध्यक्ष हेनरी कॉटन (क्शपी ऊेीप) यांचा जन्मदिन.
१८५२ : गणेश जनार्दन आगाशे - नामांकित शिक्षक, संस्कृत पंडित, व्युत्पन्न ग्रंथकार, उत्तम वक्ते व इंदूर येथे भरलेल्या १० व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (मृत्यू: )
१८५७ : मिल्टन हर्शे - 'द हर्शे चॉकलेट कंपनी'चे संस्थापक (मृत्यू: १३ आक्टोबर १९४५)
१८६५ : भारतीय-इंग्रजी फील्ड मार्शल विल्यम बर्डवुड यांचा जन्म. (मृत्यू: १७ मे १९५१)
१८८६ : सर रॉबर्ट रॉबिनसन - वनस्पतिज रंग व अल्कलॉईड्सवर संशोधन करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९७५)
१८९० : मोनाको ग्रांप्री चे संस्थापक अँटोनी नोगेस यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑगस्ट १९७८)
१९३२ : डॉ. प्रभा अत्रे - शास्त्रीय गायिका
१९३९ : साली प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी व निबंधकार भागवत रावत यांचा जन्मदिन.
१९४६ : साली परमवीर चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय सैन्य दलाचे अधिकारी मेजर रामास्वामी परमेश्वरन यांचा जन्मदिन.
१९६७ : मायकेल जॉन्सन - अमेरिकन धावपटू
१९६९ : शेन वॉर्न - ऑस्ट्रेलियन लेगस्पिनर
१९७१ : गोरान इव्हानिसेव्हिच - क्रोएशियाचा लॉन टेनिसखेळाडू
१९७६ : क्रेग मॅकमिलन - न्यूझीलंडचा अष्टपैलू क्रिकेटपटू
१९८० : भारतीय हॉकी खेळाडू वीरेन रास्किन्हा यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९३ : मामा परमानंद - पत्रकार व विचारवंत, प्रार्थना समाजाचे एक संस्थापक (जन्म: ३ जुलै १८३८)
८१ : टायटस - रोमन सम्राट (जन्म: ३० डिसेंबर ३९)
१९२६ : श्रीधर पाठक - हिन्दी कवी, लखनौ येथे भरलेल्या पाचव्या हिन्दी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (जन्म: ११ जानेवारी १८५८)
१९२८ : सुप्रसिद्ध हिंदी कवी श्रीधर पाठक यांचे निधन. (जन्म: ११ जानेवारी १८५८)
१९२९ : लाहोर कटातील क्रांतिकारक जतिन दास यांनी तुरुंगातील जुलुमाचा निषेध म्हणून केलेल्या उपोषणात त्यांचा ६३ व्या दिवशी मृत्यू झाला. (जन्म: २७ आक्टोबर १९०४)
१९७१ : केशवराव त्र्यंबक दाते - चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते, नाट्यशिक्षक. महाराष्ट्र नाटक मंडळी या संस्थेच्या नाटकांमधून त्यांनी काही स्त्री नायिकांच्या भूमिका केल्या. (जन्म: २४ सप्टेंबर १८८९ - अडिवरे, रत्नागिरी, महाराष्ट्र)
१९७३ : भारतीय कवी आणि तत्त्ववेक्षक सज्जाद झहिर यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १९०५)
१९७५ : भारतीय गायक आणि संगीतज्ञ मुदिकॉन्दाम वेंकटरम अय्यर यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १८९७)
१९९५ : डॉ. महेश्वर नियोग - प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (जन्म: ७ सप्टेंबर १९१५ - कमरफादिया, शिवसागर, आसाम)
१९९७ : लालजी पाण्डेय तथा 'अंजान' - हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार (जन्म: २८ आक्टोबर १९३०)
२००४ : गर्भनिरोधक गोळी चे संशोधक लुइस ई. मिरमोंटेस यांचे निधन. (जन्म: १६ मार्च १९२५)
२०१२ : रंगनाथ मिश्रा - भारताचे २१ वे सरन्यायाधीश (जन्म: २५ नोव्हेंबर १९२६)

cmyk



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

रविवार दि.१३ सप्टेंबर २०२६

५



# माफसूच्या विकासकामांना गती देण्याचे मंत्री पंकजाताई मुंडे यांचे निर्देश

## शिक्षक-शिक्षकेत्तर पदभरती, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व शुल्क संरचनेचा घेतला आढावा

मुंबई। प्रतिनिधी

पशुवैद्यक विज्ञान व पशुसंवर्धन पदवी (बी.व्ही.एससी. अँड ए.एच.) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना इतर वैद्यकीय शाखांप्रमाणे हे विद्यावेतन १८ हजार रुपये करण्याबाबतचा प्रस्तावाच्या ४ कोटी १२ लाख रूपये करण्याबाबतच्या प्रस्तावाला आगामी मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेण्यासाठी कार्यवाही करावे.विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावून विद्यार्थ्यांना हॉस्टेल सह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले.मंत्रालयात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरच्या (च-ऋ्रडण) शैक्षणिक, प्रशासकीय तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांचा पशू व मत्स्य संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला.यावेळी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील,अधिष्टाता डॉ शिरीष उपाध्ये,कुलसचिव मोना ठाकूर,उपकुलसचिव डॉ.ए.पी.गांवडे, सहसचिव नि.भा.मराळे यावेळी उपस्थित होते.

मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांच्या भरती प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला यावेळी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती गतीने कार्यवाही करण्यात यावी. भारतीय पशु चिकित्सा परिषदेच्या (तउख) मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक शिक्षकवर्ग उपलब्ध करून देण्यासाठी या भरती प्रक्रियेला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा व बांधकाम प्रकल्पांची कामांची सद्यस्थिती तपासून पहा. शैक्षणिक इमारती, रुग्णालये तसेच वसतिगृहांच्या बांधकाम प्रकल्पांमध्य मुंबई, नागपूर, परभणी, शिरवळ, उदगीर, वरूड, उदगीर, मोर्शी येथील समावेश आहे या कामांचे प्रगतीनिहाय अहवाल करून ही कामे गतीने करा अशा सूचना त्यांनी केल्या.विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व इंटर्नशिप भत्ता तसेच पशुवैद्यकीय व दुग्ध तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या शुल्क संरचनेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक कार्यवाही वेगाने पूर्ण करावेत.विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा व बांधकाम प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करणे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने राबवावे. यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आणि कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले.



## शेतकरी हक्क मोर्चाच्या ‘हलगी बजाव’ आंदोलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहा!

### लिंबागणेशकरांचे हलगी वाजवत शेतकऱ्यांना आवाहन



बीड। प्रतिनिधी

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सोयाबीन, कापूस व तूर पिकांचा अक्षरशः धुराळा झाला आहे. तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य ‘हलगी बजाव’ आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी शनिवारी दि. १२ सप्टेंबर रोजी लिंबागणेश येथे हलगी वाजवत केले.

नुकसानीचे तातडीने पंचनामे करून एकरी ४० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी.मागील अतिवृष्टीच्या घोषणेनुसार हेक्टरी १७ हजार रुपये पीकविमा द्यावा.२०२० सालचा थकीत पीकविमा शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावा.बीड जिल्ह्यातील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून दुष्काळ जाहीर करावा.शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्ह्यातील गावागावांत शेतकरी बैठका घेऊन जनजागृती करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांची माहिती देतानाच आगामी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे.वाकनाथपूर येथे झालेल्या शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शेतकरी बैठकीत पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून एकरी ४० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, मागील अतिवृष्टीतील घोषणेनुसार हेक्टरी १७ हजार रुपये पीकविमा द्यावा, २०२० सालचा थकीत पीकविमा तात्काळ जमा करावा तसेच जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा, अशा मागण्या करण्यात आल्या.या मागण्यांकडे शासन व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी हक्क मोर्चाचे डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, रविंद्र निर्मळ, बाळुकाका थोरात, सर्पमित्र अशोक जाधव, महादेव कुदळे, अर्जुन घोलप, गणपत तागड, संतोष भोसले, दादा गायकवाड, बाळासाहेब मुळे, शंकर वाणी, रामदास मुळे, रामकिसन गिरे, रामदास वाणी, शहाजी वाणी, संजय पावले, गणेश थोरात, कृष्णा वाणी यांच्यासह आदी शेतकरी उपस्थित होते.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जामखेडात पोलिसांचा रूट मार्च

### जमाव विसर्जनाचे प्रात्यक्षिक; पोलीस, होमगार्ड, तहसील व आरोग्य विभागाचा सहभाग

जामखेड। प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जामखेड पोलिसांकडून रूट मार्च व जमाव विसर्जनाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या आदेशानुसार बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आली. या उपक्रमातून सण-उत्सव काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये, तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलीस यंत्रणा सज्ज असल्याचा संदेश देण्यात आला.जामखेड पोलीस स्टेशनपासून दुपारी १२.२५ वाजता रूट मार्चला सुरुवात झाली. बीड कॉर्नर, मेन पेठ, खर्डा चौक, तपनेश्वर रोड, नूरानी कॉलनी व सदाफुली वस्ती या मार्गावरून हा मार्च काढण्यात आला. शहरातील प्रमुख मार्गांवरून पोलिसांनी संचलन करत नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण केली.या रूट मार्चमध्ये जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, एपीआय अजित मोरे, पीएसआय किशोर गावडे, पीएसआय गणेश आघाव, पीएसआय खेडकर यांच्यासह तीन अधिकारी व दहा पोलीस अंमलदार सहभागी झाले. तसेच खर्डा पोलीस स्टेशनचे अधिकारी व सात पोलीस अंमलदार, पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथील सहायक फौजदार अन्वर सय्यद, डीआय व होमगार्ड यांचाही सहभाग होता.रूट मार्चनंतर जामखेड बसस्थानक येथे जमाव विसर्जनाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. सहायक फौजदार अन्वर सय्यद यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रात्यक्षिकादरम्यान जमाव नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या साधनांचा वापर करण्यात आला. यावेळी एक स्टन सेल, चार लाठ्या व एक ढाल वापरण्यात आली.या प्रात्यक्षिकावेळी जामखेड तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी येरप्पा काळे, नगरपरिषदेची अग्निशमन गाडी, ग्रामीण रुग्णालयाचे डॉक्टर व रुग्णवाहिका उपस्थित होते. त्यामुळे पोलीस यंत्रणेसोबतच महसूल, नगरपरिषद व आरोग्य विभागाचीही समन्वयाने तयारी असल्याचे दिसून आले.आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क असून, नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.दरम्यान, रूट मार्च व जमाव विसर्जनाचे प्रात्यक्षिक दुपारी १.३५ वाजता शांततेत पार पडले. या कारवाईबाबतची माहिती पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी दिली.

## स्वा.सै.रामभाऊजी राऊत सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

जालना। प्रतिनिधी

स्वा. सै.रामभाऊजी राऊत नागरी सहकारी पतसंस्थेची सविसावी (२६) वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेश राऊत यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी ( ता. १२)पतसंस्थेच्या सभागृहात संपन्न झाली .राजेश राऊत याप्रसंगी म्हणाले की, २६ वर्षांपूर्वी सर्वसामान्यांचे हित लक्षात घेऊन स्थापन केलेल्या संस्थेस संचालक, सभासद व ठेवीदारांनी सहकार्य केले .पारदर्शी कारभार ,उत्तम सेवा व सचोटी या त्रिसूत्रीवर संस्था ग्राहकांना तत्पर सेवा देत असल्याने ठेवीदारांचा विश्वास अधिक दृढ झाला असल्याचे



राजेश राऊत यांनी सांगितले.

यावेळी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवण्यात आले.तसेच गत आर्थिक वर्षातील अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, सन २० २६ - २७ वर्षासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती, मानधन,अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. यावेळी संचालक प्रा. राजेंद्र भोसले, सागर देवकर, नवीन पटेल,शांतीलाल राऊत, जिल्हा सहकार अधिकारी एस.आर.पवार यांच्यासह सभासद ज्ञानदेव सोळुंके, भानुदास गायकवाड, दीपक मोहिते , राहुल परदेशी, विजय ढोलके ,जफर खान, पंडित भुतेकर, मधुकर लोंढे, ज्ञानेश्वर देवडे, गणेश आगलावे ,वंदना सातपुते ,सुमन सातपुते ,चंदन मिश्रा,पवन मुंढे, संजय वाघमारे,आदी सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

## यवतमाळमधील फुलसावंगी यात्रेत आकाश पाळण्यात थरार

### महिलेचे केस बेरिंगमध्ये अडकले अन् डोक्याची चामडी निघाली, प्रकृती गंभीर

यवतमाळ

सणासुदीच्या काळात यात्रेचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या एका महिलेवर अत्यंत भयंकर प्रसंग ओढवल्याची घटना यवतमाळ जिल्ह्यातून समोर आली आहे. महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथील यात्रेत आकाश पाळण्यात बसलेल्या एका महिलेचे केस फिरत्या बेरिंगमध्ये अडकले. पाळण्याचा वेग जास्त असल्याने अवघ्या काही सेकंदात या महिलेचे केस जोराने खेचले गेले आणि केसांसह त्यांच्या डोक्याची चामडीच उपटून निघाली. या काळजाचा ठोका चुकवणाऱ्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

फुलसावंगी येथील पुणेश्वर मंदिराच्या पायथ्याशी तान्हा पोळ्याच्या निमित्ताने मोठी यात्रा भरली होती. या यात्रेचा आनंद घेण्यासाठी बाली मारोती टाळीकोटे या महिला आल्या होत्या. त्या यात्रेतील आकाश पाळण्यात बसल्या. पाळणा वेगाने गोल फिरत असताना अचानक त्यांचे केस पाळण्याच्या फिरत्या बेरिंगमध्ये अडकले. वेगवान चक्रामुळे त्यांचे केस थेट मशीनमध्ये जोराने ओढले गेले.



क्षणाचाही विलंब न होता, केसांसोबत त्यांच्या डोक्याची त्वचा (चामडी) अक्षरशः उपटून निघाली. त्यामुळे त्या गंभीर जखमी झाल्या.

महिलेचा आक्रोश आणि हा भयानक प्रकार खाली उभ्या असलेल्या नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने आरडाओरड सुरू केली. नागरिकांच्या आणि संयोजकांच्या सतर्कतेमुळे आकाश पाळणा तत्काळ थांबवण्यात आला. रक्तबंबाळ अवस्थेत असलेल्या बाली टाळीकोटे यांना मोठ्या मुश्किलीने पाळण्यातून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. अत्यंत गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तातडीने पुसद येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.या थरारक आणि अंगावर काटा आणणाऱ्या घटनेमुळे यात्रेतील उत्साहावर मोठे विरजण पडले असून नागरिकांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## पाणी नाही, तरी परंपरा जपली; लोहाऱ्यात बैलपोळा साजरा

लोहारा। प्रतिनिधी

तालुक्यात यंदाचा बैलपोळा सण दुष्काळाच्या सावटाखाली साजरा करण्यात आला. दरवर्षी पोळ्याच्या दिवशी रिमझिम पाऊस, ढगाळ वातावरण आणि सर्वत्र हिरवळ असे निसर्गरम्य चित्र पाहायला मिळते. मात्र यंदा पावसाने पाठ फिरवल्याने पिके करपण्याच्या मार्गावर असून, विहिरी, तलाव, नदी-नाले कोरडे पडले आहेत. परिणामी शेतकऱ्यांना थोडक्या पाण्यातच पशुधन धुवावे लागले. त्यामुळे उत्साहाच्या सणावर दुष्काळाची छाया स्पष्टपणे जाणवली.बैलपोळा हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा सण मानला जातो. वर्षभर शेतीच्या कामात साथ देणाऱ्या पशुधनाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. पोळ्याच्या पूर्वसंध्येला बैलांसह गायी, म्हशी व इतर पशुधन स्वच्छ धुऊन त्यांच्या खांद्यावर हळद-लोणी लावून खांदामळणी करण्यात आली.

पशुधनाला रंगीबेरंगी रंगांनी सजवून त्यावर सुभाषिते व घोषवाक्ये लिहिण्यात आली होती. पिवळ्या रंगासह गोंड्याच्या माटाट्या, कवड्यांच्या माळा, घुंगरांच्या घारमाळ्या, शिंगांना रंगीत बेगडी साज, बाशिंग, शेंबी व रंगीबेरंगी फुग्यांनी बैलांना सजवण्यात आले. सजवलेल्या बैलांची गावातून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. ग्रामदैवताला फेरी मारून घरी आणल्यानंतर पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर सहकुटुंब, मित्र व नातेवाईकांसोबत गोडधोड जेवणाने सणाची सांगता झाली. बैलपोळ्याच्या दिवशी ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांच्या घरात पुरणपोळी, गोडधोडासह खास ‘खोडबळ्या’चा बेत केला जातो.

## भेसळीच्या संशयावरून अहिल्यानगरला एफडीएकडून ४ कोटींचे बटर जप्त

अहिल्यानगर। प्रतिनिधी

सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा मोठा प्रकार समोर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अहिल्यानगर शहरात एमआयडीसी परिसरातील एका कोल्ड स्टोरेजवर रात्री अचानक धाड टाकून तब्बल ३ कोटी ९५ लाख ६२ हजार ३२० रुपयांचे बटर जप्त केले आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार ही धडक कारवाई करण्यात आली.

नागापूर औद्योगिक वसाहतीतील अरिहंत कोल्ड स्टोरेजवर १० सप्टेंबर रोजी रात्री एफडीएच्या पथकाने हा छापा टाकला. या ठिकाणी कमी दर्जाचे आणि लेबलच्या नियमांचे उल्लंघन करून तयार केलेले तब्बल ७५ हजार ३५६ किलो लोणी साठवून ठेवण्यात आले होते. हा अवाढव्य साठा पतंजली फूड्स लिमिटेड कंपनीचा असल्याचे एफडीएने स्पष्ट केले आहे. अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करत हा सर्व साठा सील केला आहे. जप्त बटरचे नमुने प्रयोगशाळेत पाठवले असून अहवालानंतर दोषींवर अन्न फौजदारी कारवाई केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. एफडीएने पुण्यात ३९ लाख रुपये किमतीचा ४६०० किलो



खवा आणि १२ हजार ५०० किलो पनीर जप्त करण्यात आले आहे. बुधवार पेठ परिसरातून पनीर आणि खव्याने भरलेले चार ट्रकही ताब्यात घेतली आहेत. एफडीएच्या अधिकाऱ्यांनुसार, जप्त केलेला ११ लाख ६० हजार रुपये किमतीचा खवा सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथून आणला होता. हा खवा २० किलोच्या गोण्यांमध्ये अस्वच्छ स्थितीत ठेवला होता. याशिवाय, कर्नाटकातील बेळगाव आणि बागलकोट भागातून आलेले मलाई पनीर, लो-फॅट पनीर व मिडीयम-फॅट पनीर पकडले. या १२,५०० किलो पनीरची अंदाजे किंमत २७ लाख ८३ हजार रुपये आहे. शहरातील २५ ते ३० व्यापाऱ्यांनी पनीरची तर ३० ते ३५ व्यापाऱ्यांनी खव्याची ऑर्डर दिली होती.

# लुखेगावात सिंदफणा नदीत अवैध वाळू उपसा

## पाहणीनंतर पत्रकारांना धमकी; मंडळ अधिकारी, तलाठ्यांकडून पाहणी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मंजरथ मंडळातील लुखेगाव येथील सिंदफणा नदीपात्रात अवैधरीत्या वाळू उपसा सुरू असल्याची माहिती समोर आल्यानंतर मंडळ अधिकारी व तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. मात्र, पाहणी होऊनही संबंधित अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध ठोस कायदेशीर कारवाई झाल्याचे दिसून येत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

लुखेगाव परिसरातील सिंदफणा नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू काढली जात असल्याने नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर तसेच परिसरातील पर्यावरणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाच्या मंडळ अधिकारी व तलाठ्यांनी संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली.




प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केल्यानंतरही अवैध वाळू उपशावर कोणती कारवाई करण्यात आली, याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम आहे. पाहणीचा अहवाल तयार करण्यात आला आहे का? संबंधितांवर पंचनामा करण्यात आला आहे का? अवैध वाळू वाहतुकीची वाहने अथवा उत्खननासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, या अवैध वाळू उपशाची माहिती संकलित करून वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना संबंधित वाळू उपसा करणाऱ्यांकडून जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. अवैध वाळू उपशाबाबत वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना धमकावण्याचा प्रकार घडत असेल, तर प्रशासन व पोलिसांनी त्याची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे.

अवैध वाळू उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असून नदीपात्राचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे महसूल विभागाने केवळ पाहणी करून थांबण्याऐवजी नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केल्यानंतरही प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. अवैध वाळू उपशाला कोणाचे पाठबळ आहे का? कारवाई करण्यात विलंब का होत आहे? पत्रकारांना धमकी देण्याचे धाडस संबंधितांना कुठून मिळाले? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

पत्रकारांना मिळालेल्या कथित जीवे मारण्याच्या धमकीचीही पोलिसांनी स्वतंत्रपणे चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच लुखेगाव येथील सिंदफणा नदीपात्रातील अवैध वाळू उपशावर महसूल व पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे कारवाई करून नदीपात्राचे संरक्षण करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

प्रशासनाची पाहणी झाली; आता अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई कधी होणार, याकडे लुखेगावसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पाटोदा बसस्थानकातील चोरीचा गुन्हा उघडकीस

## महिला आरोपी गजाआड, सुमारे १४ लाखांचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत

पाटोदा/बीड । प्रतिनिधी

पाटोदा बसस्थानक परिसरात एका महिलेच्या बॅगेतून झालेल्या दागिन्यांच्या चोरीचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना मोठे यश आले आहे. या कारवाईत एका महिला आरोपीला ताब्यात घेऊन तिच्याकडून ८ तोळे ४ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि १०,००० रोख रक्कम असा एकूण १३,९७,१६०/- किमतीचा १०० टक्के मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पाटोदा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध दाखल असलेल्या



चोरीच्या गुन्ह्याचा (गु.र.नं. ०२६१/२०२६) स्थानिक गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करत होते. तपासादरम्यान, आरोपी महिला सोजर सुरेश भोसले (वय ४५ वर्षे, रा. पारनेर, ता. पाटोदा, जि. बीड) ही चोरीचे सोने विक्री करण्यासाठी चुंबळी फाटा येथे येणार असल्याची खात्रीशीर माहिती बातमीदाराकडून मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तातडीने सापळा रचून संशयित महिलेला पंचांसमक्ष ताब्यात घेतले.

तिची कसून चौकशी केली असता तिच्याजवळून चोरीस गेलेले ८ तोळे ४ ग्रॅम सोने व रोख रक्कम जप्त करण्यात आली.

ही धडक कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजित खुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे व त्यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. या कारवाईमुळे पाटोदा व परिसरातील नागरिकांमधून पोलिसांचे कौतुक होत आहे.

# अंबाजोगाईत स्लॅब भरताना विजेचा धक्का लागून दोन मजुरांचा दुर्दैवी अंत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील हनुमान नगर येथे एका शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या स्लॅबचे काम सुरू असताना काँक्रीट भरणाऱ्या यंत्राचा (बूम) ११ केव्ही उच्च दाबाच्या वीज वाहिनीला स्पर्श झाल्याने दोन बांधकाम मजुरांचा विजेचा तीव्र धक्का लागून मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना पंचायत समितीसमोरील मुख्य रस्त्यावर दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली असून, बबन चंद्रकांत वाघमारे आणि यशवंत कोंडीराम वाघमारे अशी या दुर्घटनेत प्राण गमावलेल्या दुर्दैवी मजुरांची नावे आहेत. या घटनेमुळे शहरात मोठी हळहळ व्यक्त होत असून मजुरांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पंचायत समितीसमोर एका शॉपिंग




कॉम्प्लेक्सचे बांधकाम सुरू आहे. दुसऱ्या मजल्याच्या स्लॅबची भराई करण्यासाठी काँक्रीट भरणारे वाहन (एमएच ४४ एसक्यू ३०४४) मुख्य रस्त्यावर उभे करण्यात आले होते. या यंत्राद्वारे तीस फूट उंचावर काँक्रीट टाकले जात असताना यंत्राच्या पाईपचा स्पर्श रस्त्यावरून जाणाऱ्या ११ केव्ही विद्युत वाहिनीला झाला. यामुळे स्लॅबवर काम करत असलेले हमाल गल्ली येथील बबन वाघमारे (वय ५०) आणि यशवंत वाघमारे (वय ३३) यांना विजेचा जोरदार धक्का बसला. गंभीर जखमी झालेल्या दोन्ही मजुरांना तात्काळ स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

या अचानक ओढवलेल्या मृत्यूमुळे दोन कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. मृत बबन वाघमारे यांच्या पश्चात दोन मुले आणि एक विवाहित ◀◀ पान ३ वर

# कर्जबाजारीपणाला कंटाळून एसटी चालकाची आत्महत्या

आष्टी । प्रतिनिधी

कर्जबाजारीपणा, सावकारांकडून पैशासाठी होणारा सततचा तगादा आणि कमी वेतनात कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याच्या आर्थिक विवंचनेतून आष्टी आगारातील एसटी चालकाने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.

अन्सार हबीब शेख (वय ४६, रा. साबलखेड) हे आष्टी एसटी आगारात चालक म्हणून कार्यरत होते. रात्रीच्या सुमारास आष्टी बसस्थानकातील विश्रांती कक्षात त्यांनी गळफास घेऊन जीवन संपवले. या घटनेने एसटी



महामंडळातील कर्मचारी व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेख हे आर्थिक अडचणींमध्ये होते. कर्जाच्या पैशांसाठी सावकारांकडून ◀◀ पान ३ वर

# आष्टीतील लोकन्यायालयात ८७ प्रकरणांचा यशस्वी निपटारा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात शनिवारी (दि. १२) आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत विविध प्रकारच्या एकूण ८७ प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात आला. यामध्ये दिवाणी स्वरूपाच्या ८३, तर आर्थिक व्यवहारांशी संबंधित ४ प्रकरणांत दोन्ही पक्षांमध्ये तडजोड घडवून वाद कायमस्वरूपी निकाली काढण्यात आले.

लोकअदालतीचे उद्घाटन सकाळी दहा वाजता आष्टी येथील वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए. बी. निवारे व वरिष्ठ स्तर सहदिवाणी न्यायाधीश के.



**आष्टी येथे आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीसाठी आलेल्या काही वयोवृद्ध व शारीरिक त्रास असलेल्या पक्षकारांशी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए. बी. निवारे यांनी कोर्ट आवारात येऊन संवाद साधला.**

के. खोमणे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकअदालतीचे महत्त्व स्पष्ट करताना, सामोपचाराने वाद मिटवल्यास वेळ व पैशांची बचत होऊन सलोखा टिकून राहतो, असे प्रतिपादन केले. लोक न्यायालयात आर्थिक प्रकरणात ३ लाख २१ हजार तर एकूण ३१ लाख २५ हजार ६८८ रकमेची तडजोड करण्यात आली.

कार्यक्रमास आष्टी वकील संघाचे अध्यक्ष टी. जे. सय्यद, उपाध्यक्ष बी. आर. खिलारे, सचिव यू. आर. पोकळे, कोषाध्यक्ष जितेंद्र खंडागळे, महिला प्रतिनिधी सोनाली पवार ◀◀ पान ३ वर

# पाच एकर सोयाबीन वर शेतकऱ्यांनी फिरवला रोटा वेटर

दिंद्रुड । प्रतिनिधी

या वर्षी पाऊस खूपच कमी आहे घेला एक महिना पाऊस पडला नाही या मुळे हाताशी आलेले पिक हे सुकून जात आहे सोयाबीन ला फुलं आली पण पाऊस नसल्याने फुलेच वाळू लागली यामुळे फकिर जवळा येथील शेतकरी सुनिल साबळे यांनी पाच एकर सोयाबीन वर रोटा वेटर फिरवला आहे या मुळे जो शेती मशागत साठी झालेला खर्च वाया गेला व हाती काहीच आले नाही अशी परिस्थिती बाकी शेतकरी वर्गाची झालेली आहे पाऊस नसल्याने कापुस सोयाबीन इतर पिकं सुकून जात असल्याचे दिसून येत आहे, निसर्गाच्या या अस्मानी दुष्काळ परिस्थितीमुळे शेतकरी हतबल झाल्याचे दिसून येत आहे,तरी तात्काळ शेतीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची मागणी होत आहे.



# ‘लोकप्रतिनिधींचा जनता दरबार काय असतो, हे आज खऱ्या अर्थाने कळाले’

## आ. धस यांच्या जनता दरबारात नागरिकांच्या प्रश्नांची तात्काळ सोडवणूक

**आष्टी । प्रतिनिधी**

लोकप्रतिनिधी आणि सामान्य नागरिक यांच्यातील थेट संवादाचे प्रभावी माध्यम म्हणून आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांच्या जनता दरबाराकडे पाहिले जात आहे. विविध प्रश्न घेऊन येणाऱ्या नागरिकांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रश्नांवर तातडीने मार्ग काढण्याचा प्रयत्न या जनता दरबारातून होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दरम्यान, पहिल्यांदाच आ. सुरेश धस यांच्या कार्यालयात येण्याचा योग आलेल्या एका नागरिकाने जनता दरबारातील कामकाजाचे सुमारे अर्धा तास निरीक्षण केल्यानंतर समाधान व्यक्त केले. लोकप्रतिनिधींचा जनता दरबार नेमका काय असतो, हे आज खऱ्या अर्थाने कळाले. अर्धा तास मी संपूर्ण कामकाज पाहत होतो. प्रत्येक व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतले जात होते आणि त्याच्या प्रश्नावर काही ना काही मार्ग काढून देण्याचा प्रयत्न केला जात होता. लोकांना केवळ आश्वासन न देता त्यांच्या प्रश्नाचे सोल्युशन शोधून देण्याची पद्धत पाहायला मिळाली, अशी प्रतिक्रिया या नागरिकाने व्यक्त केली.जनता दरबारात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळत असून, संबंधित प्रश्नाची दखल घेऊन त्यावर पुढील कार्यवाहीसाठी मार्गदर्शन केले जात असल्याने नागरिकांमध्येही समाधानाचे वातावरण असल्याचे दिसून येत आहे.‘प्रश्न घेऊन आलेल्या माणसाला ऐकून घेणे आणि त्याच्या प्रश्नावर मार्ग काढणे, हीच खरी लोकप्रतिनिधित्वाची ओळख’, अशी भावना या निमित्ताने नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



# तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे मार्गदर्शन

## येळंबघाट व लिंबागणेश येथे कुणबी प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिर !

बीड । प्रतिनिधी

मराठा समाजातील नागरिकांना कुणबी , मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र सुलभतेने व विनाविलंब मिळावे , यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे . या मोहिमेअंतर्गत दि . १० ते १७ सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळांच्या स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे . या शिबिरांच्या




माध्यमातून जुन्या महसुली नोंदी व इतर उपलब्ध पुरावे शोधणे , नागरिकांकडून प्राप्त अर्जांची छाननी करणे , आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करणे तसेच पात्र अर्जदारांना नियमानुसार प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे .


याच अनुषंगाने आज , शुक्रवार , दि . ११ सप्टेंबर रोजी येळंबघाट मंडळातील ग्रामपंचायत कार्यालय , येळंबघाट येथे कुणबी प्रमाणपत्राबाबत विशेष शिबिर घेण्यात आले . या शिबिरात नागरिकांना कुणबी , मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे , ◀◀ पान ३ वर

# महावितरणने स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती करू नये - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महावितरणने कायद्याचा बडगा दाखवून सर्वसामान्य गोरगरीब जनतेला स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती करू नये अन्यथा याविरूद्ध विद्युत ग्राहकांचे आंदोलन उभे केले जाईल असा इशारा अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २०२३ चे कलम ४७ (पाच ) अन्वये विद्युत ग्राहकाने मागणी केली तरच वितरण कंपनीने त्याला स्मार्ट प्रीपेड मीटर द्यावे याचाच अर्थ स्मार्ट प्रीपेड मीटर ही ग्राहकाची निवड आहे सक्ती नाही. हा कायदा संसदेने केलेला आहे आणि तो सर्व नियमानपेक्षा वरचढ आहे. सरकारने आर.डी.एस.एस अंतर्गत देशामध्ये २० कोटी, स्मार्ट मीटर ग्राहकांच्या माती मारण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. संबंधित कंपनीला याद्वारे अब्जावधी रूपयांचा फायदा होणार आहे तसेच मधल्या दलालांना सुद्धा यामध्ये दलालीचे कोट्यावधी रूपये मिळणार आहेत. त्याकरिता सर्वसामान्यांच्या माथी हा भुर्दंड मारण्याचे पाप हे सरकार करत आहे.



ठरवलेल्या २० कोटी स्मार्ट मीटर बसविण्याच्या उद्दिष्टापैकी ६.१३ कोटी मीटर बसून झालेले आहेत आणि उर्वरित मीटर बसविण्याची लगीन घाई हे सरकार करीत आहे. यामध्ये कोट्यावधींचे कमिशन मिळत असल्याचा अंदाज अनेक जाणकार लोकांनी व्यक्त केलेला आहे. या मीटरला न बसविण्याचा अधिकार सर्वसामान्य विद्युत ग्राहकांना कायद्याने दिलेला आहे. संबंधित स्मार्ट मीटर मुळे वीज बिलामध्ये किमान २० टक्केची तफावत असल्याचे ज्यांच्याकडे हे स्मार्ट मीटर बसवले आहेत अशा ग्राहकांनी तक्रारी दाखल केलेल्या आहेत. त्यामुळे अंबाजोगाई मधील सर्वसामान्य नागरिकांनी हे स्मार्ट मीटर बसवायचे नसेल तर महावितरणच्या मीटर बदलण्यासाठी आलेल्या लोकांना स्पष्टपणे नकार द्यावा. ते जर सक्ती करत असतील तर महावितरणला लेखी तक्रार अर्ज करा त्याची पोच घ्या आणि तरीही त्यांनी ऐकले नाही तर महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाकडे किंवा विद्युत ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे आपली अधिकृत तक्रार करावी व भविष्यामध्ये येणाऱ्या ज्यादा बिलापासून स्वतःचा बचाव करावा असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी अंबाजोगाई शहरातील नागरिकांना केले आहे. हायकोर्ट मध्ये स्मार्ट मीटर बसविण्याबाबत अनेक पीआयएल दाखल असताना महावितरणने सर्वसामान्य जनतेला शक्तीने हे मीटर बसविण्याची घाई करू नये अशी अपेक्षा देखील सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केली आहे.

# परळीत उभारणार ७६५ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्र व विद्युत जोडणी प्रकल्प, ऊर्जा विभागाकडून १३४५ कोटींची मंजुरी

## धनंजय मुंडेंनी मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ येथे महापारेषण मार्फत ७६५ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्र व विद्युत जोडणी प्रकल्पास राज्य सरकारच्या ऊर्जा विभागाने १३४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.



राज्य सरकारने राज्यातील एकूण वीज मागणीचा विचार करता अतिउच्च दाब प्रणाली विकसित करण्यासाठी या प्रकल्पास परळी येथे उभारण्यास माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या विनंतीनुसार मान्यता दिली असून, याबद्दल श्री मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार मानले आहेत. या उपकेंद्रामध्ये ७६५ के.व्ही. अतिउच्च दाब उपकेंद्र, १५०० क्षमतेचे ३ ट्रान्सफॉर्मर, यांसह आवश्यक विद्युत जोडणी इत्यादी कामे करण्यात येणार असून, यामुळे विद्युत निर्मिती व पारेषण क्षेत्रात परळीचे वजन वाढणार आहे तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीस वाव मिळणार आहे. येत्या काही दिवसातच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून शासकीय शिक्षण संस्था, शासकीय व्यावसायिक शिक्षण संस्था, पायाभूत सुविधा, तीर्थक्षेत्र विकास अशा विविध विकास प्रकल्पांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी परळी मतदारसंघास प्राप्त होत असून, अनेक विकासकामे व रोजगार निर्मिती प्रगतीपथावर आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26